


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. ०६ मार्च २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १०० | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# ३९ चौकार.. ३४ षटकार.. ४९९ धावा!

## वानखेडेवर धावांचा 'महापूर', भारताची विक्रमी चौथ्यांदा वर्ल्डकप फायनलमध्ये धडक

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबईच्या ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर आज धावांचा असा काही पूर आला की क्रिकेटच्या इतिहासातील अनेक जुने विक्रम मोडीत निघाले. टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत भारताने इंग्लंडचा पराभव करत दिमाखात अंतिम फेरीत धडक मारली आहे. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात चौथ्यांदा फायनल गाठणारा भारत हा पहिलाच संघ ठरला आहे. संजू सॅमसनची ८९ धावांची झंझावाती खेळी आणि गोलंदाजांनी मोक्याच्या क्षणी मिळवलेल्या विकेट्सच्या जोरावर भारताने इंग्लंडचे तगडे आव्हान ७ धावांनी मोडीत काढले. भारताने उभ्या केलेल्या २५३ धावांच्या महाकाय डोंगराचा पाठलाग करताना इंग्लंडने २४६ धावांपर्यंत मजल मारली.

### विक्रमी 'बाउंड्री'चा पाऊस

आजचा सामना म्हणजे केवळ क्रिकेट नव्हता, तर चौकार आणि षटकारांची आतिशबाजी होती. एकूण ७३ बाउंड्री : या सामन्यात एकूण ७३ बाउंड्री (३९ चौकार आणि ३४ षटकार) लगावण्यात आल्या. यापूर्वी २०१६ मध्ये याच मैदानावर इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका सामन्यात ६१ बाउंड्री लागल्या होत्या, तो विक्रम आज मागे पडला. षटकारांचा नवा उच्चांक : सामन्यात एकूण ३४ षटकार ठोकले गेले, जो टी-२० विश्वचषकातील एकाच सामन्यातील सर्वोच्च आकडा आहे.

इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला, जो भारतीय फलंदाजांनी चुकीचा ठरवला. सलामीवीर अभिषेक शर्मा (९) लवकर बाद झाल्यावर संजू सॅमसन (८९ धावा, ४२ चेंडू) आणि इशान किशन (३९ धावा, १८ चेंडू) यांनी केवळ ४५ चेंडूंत ९७ धावांची भागीदारी केली. सॅमसनने ७ षटकार ठोकून वानखेडे मैदान डोक्यावर घेतले. त्यानंतर मधल्या फळीत शिवम दुबे (४३) आणि अखेरच्या षटकात तिलक वर्माने (२१ धावा, ७ चेंडू) आणि हार्दिक पंड्याने (२७) केलेल्या फटकेबाजीमुळे भारताने २० षटकांत ७ बाद २५३ ची विश्वविक्रमी धावसंख्या उभारली. २५४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात खराब झाली. हार्दिक पंड्याने पहिल्याच षटकात फिल सॉल्टला बाद केले. त्यानंतर जसप्रीत बुमराहने हॅरी ब्रूकला (७) आणि वरुण चक्रवर्तीने जोस बटलरला (२५) बाद करून इंग्लंडला अडचणीत आणले. मात्र, जॅकोब बेथेलने भारतीय गोलंदाजीवर प्रतिहल्ला चढवला. त्याने केवळ ४८ चेंडूंत ८ चौकार आणि ७ षटकारांसह १०५ धावांचे शानदार शतक ठोकले. बेथेल आणि विल जॅक्स (३५) यांनी इंग्लंडला विजयाच्या उंबरठ्यावर नेले होते. शेवटच्या काही षटकांत सामना कोणाच्याही बाजूने झुकू शकत होता. १८.३ षटकात हार्दिकने सॅम करनला बाद करून धाकधूक वाढवली. १९ व्या षटकात बेथेल शतकी खेळी करून खेळत असताना दुसरी धाव घेण्याच्या नादात हार्दिक पंड्याच्या अचूक थ्रोवर संजू सॅमसनने त्याला धावबाद केले. हाच सामन्याचा 'टर्निंग पॉईंट' ठरला. जोफ्रा आर्चरने शेवटी ४ चेंडूंत १९ धावा करून प्रयत्न केला, पण इंग्लंडला ७ धावा कमी पडल्या. सामनावीर ठरलेल्या संजू सॅमसनने आपल्या बॅटने ब्रिटीश गोलंदाजांची पिसं काढली. "वानखेडेवर खेळणं ही एक वेगळीच भावना आहे. मी केवळ प्रक्रियेवर लक्ष दिले आणि धावा येत गेल्या," अशा शब्दांत संजूने आपल्या खेळीचे वर्णन केले. दुसरीकडे, जिथे इंग्लंडचे वेगवान गोलंदाज धावा रोखण्यात अपयशी ठरत होते (धावगती १७.००), तिथे जसप्रीत बुमराहने आपल्या अनुभवाचा वापर करत अत्यंत संथ चेंडूंवर केवळ ६ च्या इकॉनॉमीने धावा दिल्या आणि १ बळी घेतला. त्याच्या या स्पेलने सामन्याचे पारडे भारताच्या बाजूने झुकवले.



### धावांचा डोंगर : क्रिकेट इतिहासातील दुसरा मोठा सामना

भारत आणि इंग्लंड यांच्यातील या अटीतटीच्या लढतीत एकूण ४९९ धावा झाल्या. आंतरराष्ट्रीय टी-२० इतिहासातील हा दुसरा सर्वात मोठा धावसंख्येचा सामना ठरला आहे. लॉन्ग-ऑफला तैनात असलेल्या हार्दिक पंड्याने चपळाईने चेंडू उचलला आणि यष्टीरक्षक संजू सॅमसनच्या दिशेने एक वेगवान 'फ्लॅट थ्रो' फेकला. सॅमसनने चेंडू अलगद झेलून क्षणाचाही विलंब न लावता यष्ट्या उडवल्या. बेथेलने डायव्ह मारूनही तो क्रीझपासून बराच दूर होता. बाद झाल्याचे समजताच बेथेलने हताश होऊन खेळपट्टीवरच डोके टेकवले, तर दुसरीकडे संपूर्ण वानखेडे स्टेडियम 'इंडिया-इंडिया'च्या जयघोषाने दुमदुमले.

## थोडक्यात...

### रस्त्याचे काम होण्यापूर्वीच पथकर वसुलीची तयारी

**अलिबाग : मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठणे आणि कोलाड येथील पुलांची कामे वगळली तर पळस्पे ते इंदापूर टप्प्यातील महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. काम पूर्ण होण्याआधीच पथकर नाके कार्यान्वित करण्यासाठी प्रशासनाच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. येत्या आठवड्याभरात त्याबाबत अधिसूचना जारी होणार असल्याची माहिती महामार्ग प्राधिकरणाने दिली आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या पहिल्या टप्प्यातील पळस्पे ते इंदापूर मार्गाचे चौपदरीकरण आणि रुंदीकरण 2011 मध्ये सुरु झाले होते. विविध कारणांमुळे हे काम रखडत गेले. याला अनेक कारणे आहेत. त्यात निधीची कमतरता, पर्यावरणविषयक परवानगी मिळण्यात आलेल्या अडचणी, भूसंपादनाचा मुद्दा आणि ठेकेदाराची निष्क्रियता यामुळे विलंब होत गेला. पंधरा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आता हे काम आता मे अखेरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कोलाड, नागोठणे येथील पुलांची कामे सोडली तर बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे पथकर नाके कार्यान्वित करण्यासाठी रस्त्याचे काम होण्यापूर्वीच पथकरवसुलीची तयारी हालचालींना वेग आला आहे. पहिल्या टप्प्यात खारपाडा आणि खांब या दोन ठिकाणी पथकर द्यावा लागणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यात पोलादपूरजवळ लोहारे येथेही पथकर वसून केला जाणार आहे.**

# दापोलीतील हर्णे बंदराला सागरी रो-रो सेवेचा थांबा मिळावा

## राज्यमंत्री योगेश कदम यांची मागणी

**दापोली : (समर्थ गांवकरी)**

मुंबई ते विजयदुर्ग या सागरी रो-रो सेवेला रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील हर्णे बंदर येथे थांबा देण्यात यावा, अशी मागणी राज्याचे गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण राज्यमंत्री योगेश कदम यांनी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मुंबई ते कोकण प्रवास अधिक जलद आणि सुलभ व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत मुंबई ते विजयदुर्ग ही रो-रो सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेमुळे मुंबई–कोकण दरम्यान सागरी वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होऊन प्रवाशांना मोठी सोय होणार आहे. राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, दापोली तालुक्यातील हर्णे बंदर येथे सध्या जेट्टीचे बांधकाम सुरू आहे. दापोली तालुक्यात रेल्वे मार्गाची सुविधा नसल्याने येथील नागरिकांना मुंबईसह इतर भागात जाण्यासाठी प्रामुख्याने रस्ते किंवा सागरी मार्गावर अवलंबून राहावे लागते. अशा परिस्थितीत मुंबई–विजयदुर्ग रो-रो सेवेला हर्णे बंदर येथे थांबा दिल्यास दापोली तालुक्यासह परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होईल.

तसेच कोकणातून मुंबईकडे प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांसाठी सागरी मार्ग अधिक सोयीस्कर होईल आणि स्थानिक स्तरावर सागरी वाहतुकीला चालना मिळेल, असेही त्यांनी नमूद केले आहे. त्या अनुषंगाने मुंबई ते विजयदुर्ग रो-रो सेवेला हर्णे बंदर (ता. दापोली) येथे थांबा देण्याबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी राज्यमंत्री योगेश कदम यांनी मंत्री नितेश राणे यांच्याकडे केली आहे.



# जिष्णू देव वर्मा महाराष्ट्राचे नवे राज्यपाल; अनेक राज्यांबाबत मोठे आदेश

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरूवारी रात्री अनेक राज्यांच्या राज्यपाल बदलीचे आदेश दिले. तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची आता महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर हिमाचल प्रदेशचे राज्यपाल शिवप्रताप शुक्ला यांना तेलंगणाचे राज्यपाल म्हणून नियुक्त केले आहे. पश्चिम बंगालचे राज्यपाल सी.व्ही. आनंद बोस यांनी काल सायंकाळी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर रात्री उशीरा अनेक राज्यांचे राज्यपाल बदलण्यात आले आहेत. त्रिपुराच्या राजघराण्यात जन्मलेले जिष्णू देव वर्मा हे ईशान्य भारतातील अनुभवी राजकारणी म्हणून ओळखले जातात. २०१८ ते २०२३ या काळात त्यांनी त्रिपुराचे उपमुख्यमंत्री म्हणून काम केले होते.

तसेच वित्त, ऊर्जा आणि ग्रामीण विकास सारख्या महत्त्वाच्या खात्यांचीही जबाबदारी सांभाळली होती. १५ ऑगस्ट १९५७ रोजी त्रिपुराची राजधानी अगरतळा येथे त्यांचा जन्म झाला. १९९० च्या दशकात त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. डाव्यांचे वर्चस्व असलेल्या त्रिपुरात वर्मा यांनी भाजपाची संघटना उभी करण्याचे काम केले.

# प्रशासकीय दिरंगाईचा फटका; सिंधुदुर्गातील २६२२ शेतकरी हमीभावापासून वंचित

**सावंतवाडी : (समर्थ गांवकरी)**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात हमीभावाने भात खरेदी नोंदणी करण्यासाठी ऑफलाइन अर्ज सादर करूनही, महसूल आणि पणन विभागाच्या संथ कारभारामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. नोंदणीची मुदत संपल्याने सुमारे २६२२ शेतकऱ्यांवर आपला माल दलालांना स्वस्त दरात विकण्याची वेळ आली असून, प्रशासकीय यंत्रणेच्या भूमिकेमुळे जिल्ह्यात तीव्र संताप व्यक्त होत आहे. खरीप हंगाम २०२५ मध्ये 'ई-पीक' नोंदणी करताना जिल्ह्याच्या दुर्गम भागात नेटवर्कची मोठी समस्या निर्माण झाली होती. यामुळे अनेक शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी होऊ शकली नाही. यावर उपाय म्हणून शासनाने ऑफलाइन पद्धतीने पीक पाहणी नोंदणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, जाचक अटींचे पालन करत २६२२ शेतकऱ्यांनी तहसीलदार कार्यालयांकडे प्रस्ताव सादर केले. तहसीलदारांकडून हे प्रस्ताव उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पणन विभागाकडे पाठवण्यात आले. मात्र, या प्रक्रियेत प्रचंड वेळ गेल्याने नोंदणीची अंतिम मुदत ३१ जानेवारी २०२६ रोजी संपली. सध्या ३१ मार्चपर्यंत भात खरेदी सुरू असली, तरी पोर्टलवर नोंदणी नसल्याने खरेदी केंद्र चालक शेतकऱ्यांचा माल स्वीकारत नाहीत. जिल्हा मार्केटिंग अधिकारी श्रीकांत आभाळे यांच्या माहितीनुसार, जिल्ह्यातील ४१ केंद्रांवर आतापर्यंत ३५ हजार क्विंटल भात खरेदी झाली आहे.

# राहाता शहरातील कातनाल्यावर आधुनिक बाजार उभारणार

**राहाता : (समर्थ गांवकरी)**

जपानी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शहरातील कातनाल्यावर सुमारे ७ कोटी रुपये खर्चून आधुनिक बाजारतळ उभारले जाणार असून असे बाजारतळ उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयोग महाराष्ट्रात प्रथमच होत असल्याची माहिती भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी दिली.डॉ. विखे यांनी नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांसह कातनाल्याची पाहणी केल्यानंतर त्यांनी ही माहिती दिली. यावेळी नगराध्यक्ष डॉ. स्वाधिन गाडेकर, नगरसेवक तसेच नगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते. शहरातील आठवडे बाजारचा प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून चर्चेत आहे. बाजार विरभद्र मंदीरासमोरील मैदानात भरत असल्याने, पसिररातील व्यापाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. हे मैदान बाजारसाठी कमी पडत असल्याने शेतकरी व व्यापारी नगर-मनमाड महामार्ग व साकुरी रस्त्याच्या कडेला बसत असल्याने अनेकदा वाहतूक कोंडीची समस्याही निर्माण होत असते. ही समस्या सोडविण्यासाठी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. विखे यांनी पुढाकार घेतला आहे. शहरातून जाणारा कातनाला अंडरग्राऊंड केल्यामुळे सुमारे एक ते दीड एकर जागा वापरायला मिळणार आहे. या कातनाल्याचे भविष्यातील ५० वर्षांचे नियोजन करुन आराखडा तयार केला जाणार आहे. कातनाला अंडरग्राऊंड करुन, त्यावर जपानी तंत्रज्ञानातून आधुनिक बाजारतळ उभारण्याचा हा राज्यातील पहिला प्रयोग असणार आहे. यासाठी ७ कोटी रुपये खर्च येणार असल्याचे डॉ. विखे यांनी सांगितले.

यावेळी कातनाल्याची स्वच्छता व आराखडा तयार करून, अतिक्रमणधारकांना नोटीसा देऊन कातनाला मोकळा करण्याचे काम तातडीने हाती घेण्याच्या सूचना विखे यांनी दिल्या आहेत. शहरातील मटण मार्केटमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी 'इन्सिनरेटर' बसविण्याची योजना करण्यात आली आहे.



# भाविकांच्या बसला अपघात

## २५ जखमी, दोघांची प्रकृती गंभीर

**रत्नागिरी : (समर्थ गांवकरी)**

शिमगोत्सवासाठी गावाकडे येणाऱ्या भाविकांच्या खासगी आराम बसला भीषण अपघात झाल्याची घटना खेड तालुक्यात घडली. खेड-धामणंद मार्गावरील एनवरे येथे बोरिवलीहून सापिर्ली गावाकडे येणारी बस पलटी झाल्याने २५ प्रवासी जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे. पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास झालेल्या या अपघातातील सर्व जखमींवर कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बोरिवली येथून सापिर्ली व धामणंद परिसरातील भाविक शिमगोत्सव आणि ग्रामदेवतेच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी आपल्या गावी येत होते. नेहमीप्रमाणे ही खासगी आराम बस गुरुवारी रात्री बोरिवलीहून निघाली होती. पहाटे साडेपाचच्या सुमारास बस खेड-धामणंद मार्गावरील एनवरे येथे पोहोचली असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्डयात पलटी झाली. या बसमध्ये एकूण २८ प्रवासी प्रवास करत होते. अपघातानंतर काही प्रवासी बसमध्ये अडकून पडले होते. मात्र घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्थानिक ग्रामस्थांनी तसेच त्या मार्गावरून जाणाऱ्या इतर वाहनचालकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. बसची समोरील काच फोडून प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. जखमींना तातडीने कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.



सध्या कोकणात शिमगोत्सवाची धूम असून ग्रामदेवतांच्या पालख्या भक्तांच्या भेटीसाठी घरोघरी जात आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबईतून मोठ्या संख्येने चाकरमानी आणि भाविक आपल्या गावी येत असतात. त्याचदरम्यान हा अपघात घडल्याने परिसरात खळबळ उडाली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी दोन प्रवाशांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे.



# ३ लाखांहून अधिक नागरिकांसाठी 'कॅन्सर केअर' उपक्रम, निदान आणि उपचारांवर भर

## इंडियन कॅन्सर सोसायटी, अल्केम फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण जिल्ह्यात कर्करोग जागरूकता आणि तपासणी मोहिमेचे आयोजन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

इंडियन कॅन्सर सोसायटी (आयसीएस), अल्केम फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा आरोग्य विभाग यांनी एकत्रितरित्या 'सतर्क' हा समुदाय-केंद्रित प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश संगमनेर, अकोला, पारनेर आणि राहुरी या तालुक्यांमध्ये कर्करोगाविषयी जनजागृती करणे आणि संगमनेर तालुक्यात विशेष तपासणी मोहीम राबवणे हा आहे. या सर्वसमावेशक कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी आणि आशा कार्यकर्त्यांसह इतर आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे, जेणेकरून ते जिल्हाभर कर्करोगाबद्दल जनजागृती करू शकतील. यासोबतच संगमनेर तालुक्यात मुखाच्या, स्तनाच्या




आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासाठी विनामूल्य तपासणी शिबिरे आयोजित केली जातील. या तीन प्रकारच्या कर्करोगांनी ग्रस्त रुग्णांची संख्या ही सर्वाधिक असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळेच, स्क्रीनिंगच्या माध्यमातून या आजारांचे वेळीच निदान करणे अत्यंत आवश्यक आहे. कर्करोगपूर्व लक्षणे आणि कर्करोगाचे निदान प्राथमिक पातळीवरच झाल्यास मृत्यूचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे आणि रुग्णांच्या उपचारांवरील वाढता खर्चही वाचवणे शक्य आहे.

केवळ उपचारच नाही, तर कॅन्सरबद्दल समाजात असलेली भीती आणि चुकीचे समज दूर करणे हे या कार्यक्रमाचे महत्त्वाचे ध्येय आहे. याशिवाय, शाळा आणि कॉलेजमधील मुला-मुलींसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम राबवले जातील. यामुळे नवीन पिढी आरोग्याबाबत अधिक जागरूक होईल आणि भविष्यात एक निरोगी समाज घडवण्यास मदत होईल.

हा कार्यक्रम सरकारी प्रयत्नांना बळकटी देण्यासाठी आखला आहे. विशेषतः गरीब आणि गरजू लोकांसाठी हे वरदान ठरणार आहे. संगमनेर, अकोला, पारनेर आणि राहुरीमध्ये विविध माध्यमांतून ३ लाखांहून अधिक लोकांपर्यंत आरोग्य संदेश पोहोचवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. या मोहिमेत एकूण ४५ तपासणी शिबिरे आयोजित केली जातील, ज्यामध्ये ३,१५० लोकांची प्रत्यक्ष वैद्यकीय तपासणी केली जाईल आणि १ लाख लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली जाईल. ही तपासणी एचपीव्ही, डीएनए सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाने केली जाणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेत एसएमबीटी रुग्णालयाचे मोठे सहकार्य लाभणार आहे.

श्रीमती उषा थोरात (नॅशनल मॅनेजिंग ट्रस्टी, इंडियन कॅन्सर सोसायटी) यांनी या उपक्रमाबद्दल बोलताना म्हटले की, "कॅन्सरविरुद्धच्या लढाईत अल्केम फाऊंडेशनसोबतची ही भागीदारी अत्यंत मोलाची आहे. कॅन्सरची लक्षणे, त्यामागील कारणे आणि प्रतिबंधात्मक उपायांची पुरेशी माहिती असणे, हीच या आजारावर मात करण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. लोकांकडे योग्य माहिती असेल, तरच ते स्वतःच्या आरोग्याबाबत अधिक जागरूक होतील. आपण सर्वांनी मिळून अशा भविष्यासाठी प्रयत्न करूया जिथे कॅन्सरचे निदान वेळीच होईल, प्रभावी उपचार मिळतील आणि रुग्ण या आजारातून पूर्णपणे सावरून सुदृढ आयुष्य जगू शकतील."

अल्केम फाऊंडेशनच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, "आमचा हा कॅन्सर केअर कार्यक्रम तळागाळातील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. अहिल्यानगरमध्ये इंडियन कॅन्सर सोसायटीसोबत काम करताना अशा दुर्गम भागांपर्यंत पोहोचण्याचे आमचे उद्दिष्ट आहे, जिथे लोकांना तपासणी आणि मार्गदर्शनाच्या सुविधा सहजपणे उपलब्ध होत नाहीत. या उपक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना योग्य वेळी योग्य वैद्यकीय मदत मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. " डॉ. बापूसाहेब नगरगोजे, जिल्हा आरोग्य अधिकारी, अहिल्यानगर यांनी म्हटले की, "आमच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत मोलाचा ठरेल. समाजात सर्वाधिक आढळणाऱ्या तोंड, स्तन आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण झाली, तर ते स्वतःहून तपासणीसाठी पुढे येतील. यामुळे आजाराचे वेळेत निदान होईल आणि कॅन्सरचे वाढते प्रमाण रोखण्यास मोठी मदत होईल."

# समर्थमध्ये कौशल्य विकास कार्यशाळा उत्साहात संपन्न



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे विद्यार्थी विकास मंडळ, समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स, बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील १००विद्यार्थी सहभागी झाले होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,समर्थ कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्सचे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार,डॉ.लक्ष्मण घोलप,इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे, डॉ.शरद पारखे उपस्थित होते.

या कार्यशाळेस युवराज सचिन पोंडकुळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डाटा अनालिसिस व एआय(AI) टूल्स या विषयावर कौशल्यआत्मसात करण्याचे मार्गदर्शन केले.कच्च्या माहितीवर प्रक्रिया करूनत्यातून महत्त्वाचे निष्कर्ष काढणे. याद्वारे व्यवसायांनाभविष्यातील निर्णय घेण्यास मदत होते. एआय (AI) मुळे आता हे काम अत्यंत वेगाने आणि अचूकपणे करणे शक्य झाले आहे.कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. बदलत्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून संवादकौशल्य,नेतृत्वगुण, वेळेचे योग्य नियोजन आणि सकारात्मक दृष्टिकोन यांची जोड आवश्यक असल्याचेत्यांनी सांगितले.तसेच विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने पुढे जात सातत्याने स्वतःमध्ये सुधारणा करण्याचा सल्ला दिला. प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रा.गणेश बोरचटे यांनी सर्वांचे आभार मानले.

# चुना लावून सागर कारिवडेकर फरार

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे शहरातील व्यावसायिक श्री सचिन राणे आणि सौ प्रिती राणे या दांपत्यासह त्यांच्या ओळखीमधील सुमारे 1200 गुंतवणुकदारांना सुमारे सव्वाशे कोटी रूपयांना चुना लावून सागर कारिवडेकर नामक भामट्याने पळ काढला असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राणे दांपत्य ठाण्यात कोरोना काळापासून शेअर ट्रेडिंग प्रशिक्षण वर्ग यशस्वीपणे चालवित आहेत. त्यांचे संपूर्ण महाराष्ट्रात अनेक विद्यार्थी असून, अनेकांना त्यांच्या ज्ञानाचा आर्थिक फायदा झाला आहे. याचा गैरफायदा घेऊन, सावंतवाडी येथील सागर कारिवडेकर या इसमाने, राणे यांच्या संपर्कातील गुंतवणुकदारांना शेअर मार्केटमधून मोठ्या परताव्याचे आमिष दाखवले.

# मेथीच्या मार्केटमध्ये प्रचंड धुळीमुळे शेतकऱ्यांना मनस्ताप

**प्रमोद खांडगे पाटील**

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार जुन्नर बाजार समितीचे सभापती संजयजी काळे यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की,गणपीर डोंगराच्या पायथ्याशी धना मेथीचे मार्केट सुरू केले आहे.आपणांस स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेतकरी बांधव, आडतदार, व्यापारी,मापाडी चांगल्या प्रकारचे सहकार्य करत आहेत. मार्केटला कॉंग्रेटीकरण कायम स्वरूपी करण्यात यावी, मार्केट स्थिर ठेवण्यात यावे धना-मेथी साठी कायमस्वरूपी डोम (शेड) उभारण्यात यावी जेणेकरून शेतकऱ्यांचे भाजीपाला भिजणार नाही व ऊन वाऱ्या पासून संरक्षण



होईल यासाठी डोम अत्यंत आवश्यक आहे. धना मेथीचे मार्केट प्रत्येक आडत वर दररोज नंबर वाईट लिलाव चालू होत असतात परंतु नंबर वाररीनुसार लिलाव झाल्या मुळे अगदी उत्तम पद्धतीने व्यापार होत आहे त्याचे शेतकऱ्यांना व शेतकरी संघटनेला समाधान आहे परंतु नंबर वाईज निलाव झाल्यामुळे शेतकऱ्यांना रात्री बारा एक वाजता निलाव करणे,धना मेथी मोजून देणे,व आडतदारांकडून पट्टी घेण्यापर्यंत प्रचंड वेळ जातो.

शेतकऱ्यांच्या म्हणण्या नुसार व आडतदारांबरोबर विचारविनिमय करून एकाच वेळेला सर्व आडतरांनी निलाव चालू केले तर,सोईस्कर होणार नाही का? याचा देखील आपण सर्वांबरोबर मीटिंग घेऊन आढावा घ्यावा व योग्य तो निर्णय घ्यावा? धना मेथीच्या मार्केटमध्ये प्रचंड धुळी असल्याची तक्रार शेतकरी करत आहेत.त्यामुळे शेतकरी,व्यापारी इतर सर्वांना धुळीचा त्रास होत आहे.त्यामुळे सतत मार्केटमध्ये करणाऱ्यांना त्रास होत आहे. मार्केटमध्ये काम करणारे बांधव आजारी देखील पडत आहे. त्यामुळे मार्केटमध्ये दिवसांतून किमान दोन-तीन वेळा पाणी मारणे अत्यंत गरजेचे आहे.

यावेळी प्रमुख मागण्या करण्यात आलेल्या आहेत त्यात

१) प्रामुख्याने धना मेथीच्या मार्केटमध्ये कायमस्वरूपी डोम(शेड)कॉग्रेटीकरण करणे गरजेचे आहे ही प्रमुख मागणीआहे.

२) सदर ठिकाणी शेतकऱ्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात यावे.

# अरणगाव येथे संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान

**'स्वच्छता हीच खरी सेवा'चा जागर**

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदे तालुक्यातील अरणगाव दुमाला येथे राष्ट्रसंत संत गाडगेबाबा यांची जयंती भक्तिभावाने साजरी करण्यात आली. ग्रामस्थांनी एकत्र येत संत गाडगेबाबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सरपंच मोहनराव आढाव यांनी गाडगेबाबांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या साध्या, सोप्या आणि थेट उपदेशाची आठवण करून दिली. "चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका," असा संदेश ते कीर्तनातून देत असत. "देव दगडात नसून तो माणसांत आहे," हा मानवतावादी विचार त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविला, असे त्यांनी नमूद केले.

जयंतीनिमित्त ग्रामस्थांनी गावात स्वच्छता अभियान राबवून संतांच्या कार्याला प्रत्यक्ष कृतीतून अभिवादन केले. "स्वच्छता हीच खरी सेवा" हा संदेश देत युवकांनी गावपरिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला. गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ करण्यात आली तसेच घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यात आली.

मान्यवरांनी संतांच्या विचारांचे स्मरण करून समाजातील अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि अस्वच्छतेविरुद्ध लढा देण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागात आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान' या उपक्रमाचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. सन



२०००-०१ पासून सुरू असलेल्या या अभियानातून ग्रामपंचायती व ग्रामस्थांच्या लोकसहभागातून सांडपाणी व्यवस्थापन, वैयक्तिक शौचालय उभारणी आणि घनकचरा व्यवस्थापनाची कामे राबवून गावे हागणदारीमुक्त व आदर्श करण्याचे उद्दिष्ट आहे. कार्यक्रमास सरपंच मोहनराव आढाव, छगन दिवटे, राम आढाव, सुभाष कुटे, भानुदास आढाव, तात्याभाऊ मोरे, भाऊसाहेब आढाव, हिरामण आढाव, विठ्ठल लभडे, भास्कर चव्हाण, दादा रणदिवे, ग्रामविकास अधिकारी एस. बी. जाधव, ग्रामपंचायत कर्मचारी स्वाती आढाव, बाळासाहेब नेटके यांच्यासह बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# कौशल्य विकास कार्यशाळा उत्साहात संपन्न

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे विद्यार्थी विकास मंडळ व समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स,बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे करण्यात आले होते.या कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील १०० विद्यार्थी सहभागी झाले होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,समर्थ कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्सचे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार,डॉ.लक्ष्मण घोलप,इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,डॉ. शरद पारखे उपस्थित होते.

# सैनिक स्कूल येथे विज्ञान दिन साजरा

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुका येथील सैनिक स्कूल, देवदैठण येथे शनिवार, दिनांक 28 फेब्रुवारी 2026 रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत विविध अभिनव आणि कल्पक उपक्रम सादर केले.

'इनोवेशन फॉर नेशन' ही यंदाच्या विज्ञान प्रदर्शनाची संकल्पना होती. विद्यार्थ्यांनी राष्ट्रहित लक्षात घेऊन विज्ञानाधारित मॉडेल्स व प्रकल्प सादर केले. उपक्रम तयार करताना शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी निवृत्त कर्नल साहेबराव शेळके, विद्याधाम प्रशालेचे विज्ञान शिक्षक प्रमोद रुपनर तसेच 'लोकमत'चे वार्ताहर पंकज गणवीर हे प्रमुख अतिथी



म्हणून उपस्थित होते. कर्नल शेळके यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात निसर्ग हेच मोठे विज्ञान असून त्याचा योग्य अभ्यास आणि उपयोग केल्यास जीवन समृद्ध होऊ शकते, असे सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक नितीकेश आवळे, सुषमा ससाणे, वर्षा शिंदे, कांचन मुठाळ, अपेक्षा घावटे, कविता कौठाळे आणि शिल्पा झोडगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

इयत्ता नववीतील विद्यार्थिनी सायली सुनील वीर आणि पायल नंदू कुटे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन केले. विज्ञान प्रदर्शनातील उत्कृष्ट उपक्रमांची निवड करून विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयीची आवड आणि जिज्ञासा अधिक वृद्धिंगत झाली.

# जनजागृती कार्यक्रम उत्साहात

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्री शिवाजीराव नागवडे विधी महाविद्यालय, श्रीगोंदा, जिल्हा व सत्र न्यायालय, श्रीगोंदा तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'बाल विवाह मुक्त भारत' या शंभर दिवसीय अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम दि. २ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजता सोनिया गांधी पॉलिटेक्निक महाविद्यालय, श्रीगोंदा येथील सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजीराव नागवडे विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अंजुला चौबे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे निरीक्षक एस. पी. गोलांडे तसेच सोनिया गांधी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल नागवडे यांची उपस्थिती लाभली. यावेळी प्रा. पी. जे. फाटे व प्रा. रुपाली गोळे यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी सागर पाटोळे यांनी सूत्रसंचालनाने केली. विद्यार्थी तसेच पॅरा लीगल स्वयंसेवक रूपेश पोखरकर यांनी 'बाल विवाह मुक्त भारत' अभियानाची उद्दिष्टे आणि बालविवाहाचे सामाजिक व कायदेशीर दुष्परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (पॉक्सो कायदा) अंतर्गत अल्पवयीन मुला-मुलींना मिळणारे अधिकार आणि कायदेशीर संरक्षण याबाबत माहिती दिली. अजय भापकर यांनी पॉक्सो कायद्याविषयी सखोल विवेचन करत अल्पवयीन मुला-मुलींच्या सुरक्षेसाठी असलेल्या तरतुदी स्पष्ट केल्या. साक्षी मचले यांनी 'लोकन्यायालय' या संकल्पनेची माहिती देत त्याची रचना, कार्यपद्धती आणि सर्वसामान्य नागरिकांना होणारे फायदे यावर प्रकाश टाकला.

# रापर येथे इस्कॉन हरे कृष्ण सत्संग भक्तिमय वातावरणात संपन्न

**रापर : (समर्थ गांवकरी)**

रापर येथील अयोध्यापुरी परिसरातील एका प्लॉटवर इस्कॉन हरे कृष्ण सत्संगाचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. या धार्मिक कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) उपस्थित होते. हरे कृष्ण महामंत्राच्या जपाने व भक्तीपूर्ण सत्संगामुळे परिसर पूर्णतः आध्यात्मिक रंगांनी न्हाऊन निघाला. या कार्यक्रमाचे आयोजन जगदीशभाई आंदाभाई दुबारिया यांनी केले होते. सत्संगात मोठ्या संख्येने भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला. हरे कृष्ण महामंत्राच्या जपामुळे उपस्थितांना आध्यात्मिक शांततेचा अनुभव मिळाला आणि कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. इस्कॉन संस्थेने भागवत सप्तानिमित्त नानजीभाई खिमजीभाई ठक्कर




ठाणावाला यांना मुंबईहून विशेष आमंत्रित केले होते. यावेळी इस्कॉन मंदिर भावनगरचे वेणू गायकवाड प्रभूजी यांनी नानजीभाईंना विनंती करत सांगितले की, हरे कृष्ण भक्तांना अन्नसेवा देण्यासाठी त्यांच्याकडे असलेला भूखंड वापरण्यास द्यावा. तुम्हाला गरज भासेपर्यंत तो वापरला जाईल

**डिसेंबरमध्ये भागवत कथाचे आयोजन करण्याचा निर्णय!**

आणि जेव्हा गरज पडेल तेव्हा एक महिना आधी भूखंड स्वच्छ व नीटनेटका करून सध्याच्या स्थितीत परत करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. सत्संगादरम्यान इस्कॉन संस्थेच्या कार्याची माहिती देण्यात आली. पंढरपूर येथील इस्कॉन मंदिरात हजारो भाविकांना निःस्वार्थपणे सत्संग, भजन आणि अन्नसेवा दिली जाते. गेल्या सुमारे ५० वर्षांपासून संस्था समाजकार्य करत असून अनेक भक्त त्यामध्ये सहभागी होत आहेत. देवाशी नाते जोडणे हे सर्वोत्तम कार्य असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. इस्कॉनचे नाव आज जगभर प्रसिद्ध असून देवाचे आणि वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद सदैव लाभत राहतात, असेही मार्गदर्शन करण्यात आले.

भागवत कथाकारांनी आपल्या भाषणात सांगितले की, नानजीभाई ठक्कर हे केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही समाजकार्यासाठी मदत करत आहेत. कच्छ परिसरात अनेक ठिकाणी त्यांच्या कार्याचे फलक दिसून येतात. त्यांच्या प्लॉटवर भूमिपूजन करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी विशेष आभार व्यक्त केले. या प्रसंगी वेणू गायकवाड प्रभू (इस्कॉन मंदिर भावनगर), मावजीभाई रावजीभाई चौधरी, भरतभाई नारनभाई चौधरी, बेचरभाई रघुभाई वाविया, बच्चुभाई रणछोडभाई भडवा, देवराजभाई बच्चूभाई रावरिया, हरजीभाई नानजीभाई वाविया, भरतभाई मगनलाल सुतार, शंकरभाई गेलाभाई सुतार, विशालगिरी चमनगिरी गोस्वामी, मुलजीभाई पोपटभाई गोहिल, प्रेमजीभाई धनजीभाई राजपूत, मुकेशभाई मुलजीभाई राजपूत, खेंगारभाई मावजीभाई दोडिया, नानजीभाई भचुभाई वाविया, जगदीशभाई आंदाभाई दुबारिया यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच नटवरलाल विरजीभाई ठक्कर, प्रभुलाल हरजीवनभाई ठक्कर, गावचे नेते व इतर मान्यवर यांचीही कार्यक्रमाला उपस्थिती होती. या सत्संगानंतर डिसेंबर महिन्यात भागवत कथा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून भाविकांमध्ये त्याबद्दल उत्साहाचे वातावरण आहे.

# श्री अम्मा भगवान मंदिराच्या निर्माणकार्याला शुभारंभ

## ७७वा वाढदिवस सोहळा व स्थलशुद्धी हवन विधी भक्तिमय वातावरणात!

**खालापूर (रायगड) : (समर्थ गांवकरी)**

रायगड जिल्ह्यातील खालापूर येथे निर्माणाधीन श्री अम्मा भगवान मंदिराच्या कार्यानिमित्त श्री भगवान यांचा ७७ वा वाढदिवस सोहळा आणि स्थलशुद्धी हवन विधी मोठ्या भक्तिभावाने पार पडला. या कार्यक्रमाला हजारो भक्तांनी उपस्थित राहून भक्तिमय वातावरण निर्माण केले.



या प्रसंगी परमपूज्य अरविंद दासजी, समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला), दिनेशभाई ठक्कर (मालाड) आणि अजयभाई यांची प्रमुख उपस्थिती होती. मंदिर परिसरात पार पडलेल्या या धार्मिक विधींमध्ये शेकडो भाविकांनी सहभागी होत पूजा-अर्चा आणि यज्ञकर्म केले. परमपूज्य अरविंद दासजी हे एक प्रख्यात आध्यात्मिक गुरु व प्रवचनकार म्हणून ओळखले जातात. भक्ती, नामस्मरण, सत्संग आणि विविध धार्मिक कार्यांच्या माध्यमातून ते समाजात आध्यात्मिक जागृती घडवून आणत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक ठिकाणी यज्ञ, मंदिरनिर्माण आणि सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. सध्या श्री अम्मा भगवान यांच्या पवित्र मंदिराचे भव्य निर्माणकार्य सुरू असून हे कार्य अत्यंत पवित्र व समाजोपयोगी मानले जात आहे. मंदिर हे केवळ दगड-मातीचे बांधकाम नसून श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक उन्नतीचे केंद्र असते. भविष्यात येथे नामस्मरण, सत्संग, कीर्तन, प्रवचन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या प्रसंगी बोलताना समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी सांगितले की, कोणतेही मंदिर असो, एन.के.टी. ट्रस्ट तन्मनधनाने सहकार्य करत असते. या धार्मिक कार्यक्रमात १०० ब्राह्मणांकडून हवनात आहुती देण्यात आली.

या यज्ञकर्मामुळे अमंगलाचे मंगलात रुपांतर होईल, याबाबत कोणतीही शंका नसल्याचे त्यांनी नमूद केले. अनेक भक्त येथे दर्शनासाठी येत असून मंदिराचे कार्य वेगाने सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

भव्य मंदिराचे निर्माणकार्य लवकरात लवकर पूर्णत्वास जावो आणि सर्व भक्तांना आध्यात्मिक समाधान लाभो, अशी प्रार्थना श्री अम्मा भगवान यांच्या चरणी यावेळी करण्यात आली. कार्यक्रम संपूर्णतः भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# अकोले येथे मोफत सहाय्यक साधनांचे तपासणी शिबिर

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत सहाय्यक साधनांचे तपासणी शिबिर अकोले येथे आठ मार्च रोजी आयोजित करण्यात आले असून तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी या मोफत तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अध्यक्ष डॉ.सुजय विखे पाटील यांनी केले आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (IOCL) यांच्या सी.एस.आर योजने अंतर्गत दिव्यांग जनांना मोफत सहाय्यक साधने व उपकरणे वाटप करण्यासाठी भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (ALIMCO) व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने तपासणी शिबिराचे आयोजन रविवार, दिनांक ८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत अगस्ति माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अकोले, जि.अहिल्यानगर येथे करण्यात आलेले आहे.

शिबिरादरम्यान खालील उपकरणांसाठी पात्र लाभार्थ्यांची तपासणी व नोंदणी करण्यात येणार आहे. यात व्हीलचेअर, कुबड्या, चालण्याच्या काठ्या, श्रवणयंत्र, ८० % अस्थिव्यंगासाठी बॅटरीवर चालणारी तीनचाकी सायकल, सेरेब्रल पाल्सी खुर्ची, अंध व्यक्तींसाठी ब्रेल किट, सुगम्य केन, स्मार्टफोन, ADL किट, रोलेटर्स, बॅटरी चलित व्हीलचेअर, टी.एल.एम. किट इत्यादी सहायक साधनाकरिता भारत सरकारच्या पात्रता निकष व मार्गदर्शक तत्त्वांनुसार लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात येईल. पात्र लाभार्थ्यांना ३१ मार्च २०२६ पर्यंत उपकरणांचे वितरण अकोले येथे करण्यात येणार आहे.

या शिबीराचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड व रेशन कार्ड याची मूळ प्रत व एक सत्य प्रत बरोबर आणणे गरजेचे आहे. तसेच पात्रतेसाठी दिव्यांग बांधवाने या अगोदर ३ वर्ष केंद्र शासनाच्या कोणत्याही योजनेतून सहायक साधने घेतलेली नसावी. या शिबिराचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे अकोले तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागातील प्रत्येक दिव्यांग व्यक्तीपर्यंत आवश्यक सहाय्यक उपकरणे पोहोचवून त्यांचे जीवन अधिक सुलभ आणि सोयीस्कर बनवणे आहे असे प्रतिपादन डॉ.सुजय विखे पाटील, अध्यक्ष, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांनी केले आहे. याबरोबरच सर्व दिव्यांग बांधवांची आरोग्य तपासणी विखे पाटील मेमोरियल हॉस्पीटल अहिल्यानगर चे तज्ञ डॉक्टर अकोले येथे करणार असल्याचेही डॉ.सुजय विखे पाटील यांनी सांगितले आहे. अकोले तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी या मोफत तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# बीज बँकेचा सातवा वर्धापन दिन आनंदात साजरा



**राजूर : (समर्थ गांवकरी)**

आपल्या कामावर आणि मातीवर नितांत श्रद्धा असलेल्या पद्मश्री राहीबाई पोपेरे या मातीशी आणि आपल्या कर्तव्याशी किती एकनिष्ठ आहे याचे आणखी एक उदाहरण नुकतेच पाहायला भेटले. त्यांच्या मूळ गावी म्हणजेच कोंभाळणे येथे तत्कालीन कृषी व सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या संकल्पनेतून बांधण्यात आलेल्या राज्यातील पहिल्या बीज बँकेला नुकतेच सात वर्ष पूर्ण झाले. यानिमित्त पद्मश्री राहीबाई यांनी आपल्या कुटुंबीयांसह बीज बँकेतील बियाणे व बीज बँकेचे मनोभावे पूजा करून सर्व शेतकरी वर्गाचे ऋण व्यक्त केले. प्रत्येकाचे ताट विषमुक्त व्हावे या संकल्पनेतून या बीज बँकेची स्थापना बायफ या आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त संस्थेच्या मार्गदर्शनाखाली सन 2019 मध्ये करण्यात आली . पद्मश्री राहीबाई यांनी अथक प्रयत्नातून व जिवापाड जतन केलेल्या गावरान व गावठी बियाण्याची अस्सल देशी वाण या बीज बँकेत जतन करून ठेवलेले आहेत. राज्य आणि देशातील शेतकऱ्यांपर्यंत हे अस्सल गावठी बियाणे पोहोचवण्यासाठी राहीबाई आणि त्यांचे कुटुंब गेले तीन दशके कार्यरत आहेत. चंद्रकांत दादा यांच्या मदतीने बांधण्यात आलेल्या राज्यातील पहिल्या बीज बँकेला काल सात वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त पद्मश्री राहीबाई आणि त्यांच्या कुटुंबाने या वास्तूची यथोचित व मनोभावे पूजा केली . याप्रसंगी त्यांच्या कुटुंबाने त्यांना सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार मानले. या बीज बँकेला भेट देण्यासाठी राज्य आणि राज्याबाहेरील अनेक शेतकरी व शास्त्रज्ञ तसेच कृषी विद्यापीठाचे तज्ञ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने भेट देत असतात. हजारो शेतकऱ्यांचे प्रेरणास्थान बनलेल्या या बीज बँकेला शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी अर्पण केल्याची आठवण पद्मश्री राहीबाई यांनी याप्रसंगी पुन्हा एकदा करून दिली.

# राज्य शासनाच्या अभियानाला सुरुवात

**शहापूर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या वतीने शहापूर तालुक्यात "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर" या महत्त्वाकांक्षी अभियानाचा टप्पा-१ सुरू करण्यात आला आहे. नागरिकांच्या महसुली अडचणी थेट गावपातळीवर सोडवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून मार्च 2026 मध्ये तालुक्यातील विविध मंडळांमध्ये शिबिरे होणार आहेत. तहसील कार्यालय शहापूर यांच्या पुढाकाराने आणि उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर अभियान राबविण्यात येत आहे. या शिबिरांमध्ये नागरिकांना एकाच ठिकाणी 15 पेक्षा अधिक महत्त्वाच्या महसुली सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

# जामखेड नगरपरिषदेला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्यावे

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड नगर परिषदेला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगर परिषद, जामखेड ' असे नाव देण्यात यावे, अशी मागणी पांडुरंग माने सदस्य महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक सोहळा समिती महाराष्ट्र राज्य यांनी जामखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्षांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



पांडुरंग माने याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे पराक्रमी व दूरदृष्टी लाभलेल्या शासिका अहिल्यादेवी होळकर यांचे जामखेड तालुक्याशी चोंडी हे जन्मगाव असल्याने त्यांचे जामखेडशी अतूट नाते असल्याने अहिल्यादेवींनी महाराष्ट्र व भारतासाठी विविध विकास भूमुखी व ऐतिहासिक कामे केली असून त्याच्या खुणा आजही पाहायला मिळतात. जामखेड तालुक्यातील जन्मगाव चोंडी येथील अहिल्यासृष्टी प्रसिद्ध वास्तूचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित होते. तसेच राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म्हणजे संपूर्ण हिंदुस्थानचे प्रेरणास्थान आहेत.

कुशल प्रशासक व आदर्श न्याय पद्धतीच्या जोरावर त्यांनी स्वतेच्या जगण्याचा खऱ्या अर्थाने राम आणला. जेव्हा हिंदुस्तान परकिय राजवटीमुळे शंत खंडित झाला होता. त्यास अखंडित ठेवण्याचा काम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले.

या खंडप्राय देशाच्या प्रत्येक भौगोलिक स्थानावर त्यांनी अनेक मंदिरांची निर्मिती केली व शेकडो मंदिरे जनार्दन जीर्णोद्धार केला व हिंदू संस्कृतीला पुनर्जीवित करत भारत भूमीला आत्मसन्मान मिळवून दिला. अशा या महान प्रेरणादायी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी महान कार्य केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण हिंदुस्थानला नवी दिशा दिली. देशाला अखंडित ठेवले. त्यांच्या महान स्मृती पुढे नतमस्तक होऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची 31 मे 2026 रोजी 301 वी जयंती निमित्ताने जामखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्षा जामखेड नगर परिषद यांनी समस्त अहिल्याभक्त यांचा आदर करत नामकरण करण्यास मंजुरी द्यावी असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवेदन देतावेळी युवा नेते एन.सी.पी कैलास हजारे, अध्यक्ष योद्धा ग्रुप जामखेड उमेश राळेभात, भाजपा युवक जिल्हा सरचिटणीस अहिल्यानगर महेश मासाळ, युवक नेतृत्व अमोल आरेकर हे उपस्थित होते.

# भेदभाव विरहित जीवन जगण्यासाठी संतांचे मार्गदर्शन

**ह.भ.प. दिपक महाराज देशमुख**

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

या सजीव सृष्टीतील माणसा व्यतिरिक्त कोणताही घटक भेदभाव करत नाही परंतु माणूस मात्र आपसात भेदभाव करतो आणि इतरांचे जीवन दुःखमय करतो असे प्रतिपादन अगस्ति देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त ह. भ. प. दिपक महाराज देशमुख यांनी केले. संतांनी आपल्याला भेदभाव विरहित जीवन जगण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रकारचे मार्गदर्शन केले आहे, असेही ते म्हणाले.

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले येथील राष्ट्रीय सेवा योजना आयोजित एकात्म मानव दर्शन या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष इंजिनिअर सुनील दातीर होते तर यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव सुधाकरराव देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर, उपप्राचार्य डॉ. शिवाजी खेमनर, डॉ. साहेबराव गायकवाड, डॉ. सचिन पाळंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुनिल मोहटे व सर्व विभागाचे प्रमुख उपस्थित होते.




पुढे बोलताना देशमुख महाराज म्हणाले की, एकात्म मानव दर्शन ही संकल्पना पंडित दीन दयाळ उपाध्याय आणि आपल्या साधू संतांची आपल्याला मिळालेली सर्वात मोठी देणगी आहे. संतांनी आपल्याला भेदभाव विरहित जीवन जगण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रकारचे मार्गदर्शन केले आहे. त्या मार्गावर आपण सर्वांनी पाऊल ठेवून पुढे जाणे गरजेचे आहे. जीवनाच्या प्रथम टप्प्यात विद्यार्थ्यांनी अभ्यास करून आपले जीवन ध्येय गाठले पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून आपल्यात माणूसपण आले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. आपल्या भाषणात त्यांनी विविध महापुरुष आणि संतांचे जीवन चरित्र आणि विचार विद्यार्थ्यांना उलगडून दाखविले.

अध्यक्षीय भाषणात सुनील दातीर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुनिल मोहटे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. डॉ. रंजना कदम यांनी तर आभार प्रा. गणेश भांगरे यांनी मानले. या कार्यशाळेत एकात्म मानव दर्शन या विषयावर निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय काळे, प्रा. दिपक देशमुख, प्रा. संतोष गावंडे, प्रा. सुप्रिया वैद्य आणि सर्व स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# जनतेचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडणे

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

संगमनेरच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांच्या उपस्थितीत संगमनेर नगरपरिषद व प्रजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेली विशेष कार्यशाळा बैठक आज पार पडली. या कार्यशाळेत स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज अधिक प्रभावी, जबाबदार आणि कायदेशीर चौकटीत कसे राबवता येईल यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. 'महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५' या कायद्याचा अभ्यास, नगरसेवकांची भूमिका, विविध विषय समित्यांचे महत्त्व तसेच सभागृहातील कामकाजाची पद्धत यावर प्रजा फाउंडेशन मधील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

# मुलींनी निर्भय बनलेच पाहिजे : रविंद्र भोर

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आपणास जीवनामध्ये योग्य ते मार्गदर्शन करते,तसेच जीवनात यश मिळवण्यासाठी आपण त्यांचे गुण अंगीकारावे,शिवकालीन युगामध्ये स्त्रियांना जो सन्मान मिळत होता तो सन्मान आज कालच्या परिस्थितीतही मिळवून देणे ही आपली सर्वांची जबाब-दारी आहे त्याचबरोबर प्रत्येक मुलीने निर्भय बनले पाहिजे असे आवाहन करिअर मार्गदर्शक, चाईल्ड फंड इंडिया संस्थेचे ब्रँड अॅबॅसिडर आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष,तथा जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांनी केले.



डुंबरवाडी ता:-जुन्नर येथील गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या विद्यार्थिनींना निर्भय कन्या अभियाना अंतर्गत व्याख्यान आयोजित केले होते यावेळी ते बोलत होते प्राचार्य डॉ.गोविंद खरात,तायकोंदो राष्ट्रीय रेफरी किरण जयकर,स्पोर्ट टीचर आरती बनसोडे,विभागप्रमुख, प्रा.निता बाणखेले,विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.मोनिका रोकडे,विभागप्रमुख प्रा.पूजा घोलप,प्रा.पूजा निघोजकार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सदर अभियान राबविताना छत्रपती शिवाजी महाराजांनी महिला सबलीकरण महिलांचा व्यक्तिमत्व विकास, स्त्रियांची प्रेरणास्थाने,स्त्रीयांचे स्वास्थ्य,महिला उद्यमशीलता, स्त्री-पुरुष समानता,समान संधी,लिंगभाव जागृतीसहसंवाद सहवेदना,विवाहपूर्व समुपदेशन, महिलांचा सामाजिक,कौटुंबिक सुसंवाद,विद्यार्थिनी-पालक शिक्षक परस्पर सहसंवाद, परिस्थितीजन्य निर्णयक्षमता तसेच स्त्री हक्क व अधिकार विषयक नियम संहिता कायदे. व स्त्रियांचे घटना व संवैधानिक अधिकार स्त्रीयांविरुद्ध अयोग्य वर्तन,अन्याय,प्रकारची हिंसा, मानसिक,शारीरिक,सामाजिक इत्यादी स्वरूपाचा आघात,अनुचित शेरेबाजी,अनुचित मागणी,अनुचित विनंती,तसेच इतर कोणत्याही प्रकारची शारीरिक,अशाब्दिक स्वरूपाची अस्वागतार्ह अथवा अस्विकारार्ह वागणूक तसेच स्त्रीयांच्या आत्म सन्मानाला बाधा पोचेल अशा कोणत्याही स्वरूपाच्या वर्तना पासून,अनुभवापासून व यांचा प्रतिकार व प्रतिबंध इत्यादी बिंदूंर आधारित विषयाच्या स्वरूपासार मार्गदर्शन केले.

# संत ज्ञानेश्वर विद्यालय, ढवळगावला होळीची भेट

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

ढवळगाव (ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) येथील संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास ब्रिटानिया कंपनीकडून होळीच्या निमित्ताने वॉटर फिल्टरची भेट देण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, विशेषतः मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विद्यालय सातत्याने प्रयत्नशील असून, सध्या शाळेत मुलींचे प्रमाण सुमारे ८० टक्के आहे.



ब्रिटानिया कंपनीचे प्रतिनिधी सुधीर मांडगे व अक्षय कदम यांनी मागील आठवड्यात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी व हिमोग्लोबिन तपासणी केली. यावेळी शाळेतील पाण्याची समस्या त्यांच्या निदर्शनास आली. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी त्यांनी वॉटर फिल्टर भेट स्वरूपात प्रदान केला. ब्रिटानिया कंपनीकडूनच विद्यार्थ्यांना वर्षभर बिस्किटांचा पुरवठा केला जातो. तसेच विविध क्रीडा स्पर्धा व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. बालवाडीपासून परिसरातील अनेक शाळांमध्ये कंपनीतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. याप्रसंगी विद्यालयाचे सचिव सुनील डोंगरे व मुख्याध्यापक मधुकर सुपेकर यांनी सुधीर मांडगे व अक्षय कदम यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# शेठ एन. के. टी. टी. व जे. टी. टी. महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

शेठ एन.के.टी.टी.कॉलेज ऑफ कॉमर्स आणि जे. टी. टी. कॉलेज ऑफ आर्ट्स महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला संस्थेचे प्रमुख शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर तसेच सचिव नटवरलाल विरजीभाई ठक्कर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पाटील, डॉ. मानोशी बागची आणि प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. देबोजीत सरकार उपस्थित होते. कार्यक्रमात विविध अभ्यासक्रमांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पारितोषिके, प्रमाणपत्रे आणि स्मृतिचिन्हे प्रदान करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले. संस्थेचे प्रेरणास्थान





नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांचीही या कार्यक्रमाला उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजिका गीतांजली चिपलूणकर यांनी अत्यंत सुंदर पद्धतीने केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. मानोशी बागची यांनी शैक्षणिक वर्षाचा वार्षिक अहवाल सादर करत महाविद्यालयातील विविध शैक्षणिक, सहशैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचा आढावा मांडला. विद्यार्थ्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शैक्षणिक यशाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव आणि नैतिक मूल्ये जोपासण्याचे महत्त्व अधोरेखित केले. उज्ज्वल भविष्यासाठी परिश्रम, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्लाही त्यांनी दिला. डॉ. देबोजीत सरकार यांनी यश संपादन करण्यासाठी सातत्यपूर्ण मेहनत आणि वेळेचे योग्य नियोजन अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. ध्येय निश्चित करून चिकाटीने प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. यावेळी नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांनी शिस्त ही यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी आयुष्यात शिस्त, परिश्रम आणि प्रामाणिकपणा अंगीकारावा, असे आवाहन केले. या समारंभात कला आणि वाणिज्य शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील बी.एम. एस., डेटा सायन्स, बी.बी.ए., बी.कॉम. आणि बी.ए. अभ्यासक्रमांतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

याशिवाय महाविद्यालयातील आर्ट सर्कल, जिमखाना, विद्यार्थी परिषद, एन.एस.एस., सी.जी. पी.सी., आविष्कार आणि टेकफेस्ट या समित्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाचे यावेळी कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत आणि "वंदे मातरम्" यांनी झाली. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचा समारोप संयोजिका गीतांजली चिपलूणकर यांनी केला.

# भेंडीच्या मातीचा मुलगा ठरला सीए; मयूर रौंदळ यांचे घवघवीत यश

भेंडी : (समर्थ गांवकरी)



भेंडी येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील तरुण मयूर जगन्नाथ रौंदळ यांनी अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) मार्फत घेण्यात येणाऱ्या सीए (CA) परीक्षेत यश संपादन करून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर मयूरने हे मोठे यश मिळवले असून संपूर्ण परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

श्री. जगन्नाथ गोपा रौंदळ यांचा मयूर हा मुलगा. साध्या शेतकरी कुटुंबात वाढलेला हा तरुण आज चार्टर्ड अकाउंटंट बनून अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. आर्थिक मर्यादा, ग्रामीण भागातील शैक्षणिक अडचणी आणि स्पर्धेची तीव्रता यांवर मात करत त्याने हे यश मिळवले. सीए परीक्षा देशातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक मानली जाते. अशा आव्हानात्मक परीक्षेत उत्तीर्ण होणे म्हणजे चिकाटी, संयम आणि अपार मेहनतीचे फलित होय.

या यशामागे मयूरच्या कुटुंबाचा मोठा वाटा असल्याचे गावकरी सांगतात. आई-वडिलांनी केलेले कष्ट, त्याग आणि दिलेला मानसिक आधार यामुळेच मयूरला आपले ध्येय गाठता आले. गावातील तरुणांसाठी हे यश आशेचा किरण ठरले असून "ग्रामीण भागातूनही मोठी स्वप्ने पूर्ण होऊ शकतात" हा संदेश मयूरने दिला आहे.

मयूर रौंदळ यांच्या सत्कार सोहळ्यात भेंडी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच योगेश रमेश रौंदळ, पोलीस पाटील योगेश रौंदळ, डॉ. राजश्री बोरसे, गोरख बोरसे, अशोक रौंदळ, भास्कर रौंदळ, वसंत रौंदळ, भास्कर केदा रौंदळ, केवळ रौंदळ, शंकर रौंदळ आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी मयूरच्या यशाचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. भेंडीच्या मातीतून उगवलेला हा हिरा आता व्यावसायिक क्षेत्रात नवे शिखर गाठेल, असा विश्वास गावकऱ्यांनी व्यक्त केला.



ठाणे : ठाणे महानगरपालिका व श्रीकौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार दिनांक 19 मार्च 2026 रोजी भारतीय नववर्ष अर्थात गुढीपाडव्यादिवशी स्वागतयात्रा काढण्यात येणार आहे. यंदाचे स्वागतयात्रेचे 26 वे वर्ष असून हा शहराचा उत्सव असून या उत्सवात ठाणेकरांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी आज झालेल्या बैठकीत केले. नववर्ष स्वागतयात्रेची तयारी करण्याच्या दृष्टीकोनातून आज (05 मार्च 2026) महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपमहापौर कृष्णा पाटील, विरोधी पक्षनेते अशरफ ऊ. पठाण, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, मधुकर बोडके,दिपक झिंजाड, डॉ. मिताली संचेती, परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे प्रमुख तसेच कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यासाचे विश्वस्त डॉ. नरेंद्र पाठक, कार्याध्यक्ष संजीव ब्रह्मे, निमंत्रक निखिल सुळे, सहनिमंत्रक भरत अनखिंडी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### दिव्यात राहणारे वैभव विधाटे यांची पोलीस दलात बढती

**ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरात राहणारे पोलीस कर्मचारी वैभव विधाटे यांना मुंबईच्या अप्पर पोलीस आयुक्त वनिता साहू यांच्या हस्ते पदोन्नती देत हवालदार 080779 या पदावर बढती मिळाली आहे. पोलीस दलातील गेली १७ वर्षांपासूनच्या सेवेची पोहचपावती मिळाली असून यावेळी मुंबई शहरातील जवळपास 481 पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशासनाकडून पदोन्नती देण्यात आली आहे. माझ्या आयुष्यातील पोलिस सेवेतील सर्वात आनंदाचा क्षण आज आला आहे गेली १७ वर्ष मी पोलिस सेवेत निष्कलंक सेवा पार पाडली आणि त्याच फळ म्हणजे आज मला व माझ्या सोबत माझ्या अनेक सहकारी मित्रांना पोलीस कॉन्स्टेबल ते पोलीस हेडकॉन्स्टेबल अशी पदोन्नती मिळाली आणि आज माझं स्वप्न पूर्ण झालं जे मी लहानपणी पाहिलं होतं तसेच मला माझे आईवडील , बहीण भावंडे तसेच माझे सर्व मित्र परिवार यांचे आशीर्वाद असेच मिळून अशीच माझी देश सेवा चालत राहो हीच माझी प्रार्थना असे पोलीस हवालदार वैभव विधाटे यांनी बोलताना स्पष्ट केल. प्रसंगी मित्र मंडळी नातेवाईक व इतरांकडूनही वैभव विधाटे यांना शुभेच्छा मिळत आहे**

# पारनेरात ८ व ९ मार्च रोजी भव्य 'महाआरोग्ययज्ञ'

**खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम**

पारनेर : (समर्थ गांवकरी)



पारनेर ग्रामीण रुग्णालय येथे ८ व ९ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्वात मोठ्या 'महाआरोग्ययज्ञा'चे आयोजन करण्यात आले आहे. खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या संसदीय कारकिर्दीला ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. या महाआरोग्य शिबिरात राज्यातील नामांकित रुग्णालयांतील एम.डी., एम.एस., डी.एन.बी. तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहून रुग्णांची मोफत तपासणी, निदान व आवश्यक शस्त्रक्रिया करणार आहेत. हृदयरोग, मधुमेह, रक्तदाब, सांधेदुखी, अपेंडिक्स, हर्निया, मुळव्याध, भगंदर, गाठींची तपासणी, ईसीजी, नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, १२ वर्षांपर्यंतच्या हृदयरोगग्रस्त बालकांची मोफत शस्त्रक्रिया, कान-नाक-घसा विकार, त्वचारोग, स्तन व गर्भाशय कर्करोग तपासणी, दंतरोग, आयुर्वेद-नॅचरोपॅथी उपचार तसेच पॅरालिसिस रुग्णांचे पुनर्वसन यांचा समावेश आहे. शिबिरातील सर्व तपासण्या व उपचार पूर्णपणे मोफत असतील. सहभागी रुग्णांसाठी भोजन व विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली आहे. निदान झालेल्या रुग्णांवर पुढील सहा महिने सातत्याने उपचार व फॉलोअप करण्यात येणार असून त्याचा आढावा प्रतिष्ठानमार्फत घेतला जाईल. शिबिराचे उद्घाटन ८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी आमदार रोहित पवार, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार बजरंग सोनवणे, खासदार भास्कर भगरे, माजी आमदार प्राजक्त तनपुरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कल्याण पंचायत समितीत बायोमेट्रिक हजेरी सक्तीची

ठाणे : (समर्थ गांवकरी)

कल्याण सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार विशाल कुरकुटे यांनी शासकीय कार्यालयांमधील कर्मचारी गैरहजेरी व बायोमेट्रिक प्रणालीच्या गैरवापराबाबत तक्रार केल्यानंतर प्रशासनाने तात्काळ दखल घेतली आहे. पंचायत समिती कल्याण कार्यालयाकडून यासंदर्भात अधिकृत परिपत्रक जारी करण्यात आले आहे. परिपत्रकानुसार, पंचायत समिती अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना दररोज कार्यालयात हजर राहून बायोमेट्रिक प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे. कार्यालयीन वेळेत गैरहजर राहणे, उशिरा हजेरी लावणे किंवा इतर कर्मचाऱ्यांच्या वतीने बायोमेट्रिक हजेरी लावणे अशा प्रकारांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. कार्यालयीन वेळेबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले असून, वर्ग-४ कर्मचाऱ्यांसाठी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० आणि वर्ग-३ कर्मचाऱ्यांसाठी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.४५ असा वेळ निश्चित करण्यात आला आहे.निर्धारित वेळेत उपस्थिती नोंदवली नाही किंवा कर्तव्यात कसूर आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली जाणार आहे. तसेच कार्यालयात लवकर येऊन केवळ बायोमेट्रिक हजेरी लावून बाहेर जाणे, कामकाजाच्या वेळेत गैरवापर करणे अथवा वरिष्ठांच्या परवानगीशिवाय अनुपस्थित राहणे अशा बाबींवर विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वाहनचालक व शिपाई संवर्गातील कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांनी दिलेली कामे वेळेत व योग्यरीत्या पार पाडणे बंधनकारक असून, आदेशांचे पालन न केल्यास वेतनातून कपात व प्रशासकीय कारवाई करण्यात येणार असल्याचेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

अ‍ॅड. एस डी पोखरकर — राजूर कोर्ट

**राजूर येथील दिवाणी न्यायालय, क. स्तर, राजूर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

दिवाणी वारस चौ अर्ज. ३/२०२६ — निशाणी क. ८

१. कुसूम जयराम कोकतरे, वय ५३, रा. सर्वोदय परिसर, राजुर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर, मु.रा. तेरुंगण, ता. अकोले, जि. अहिल्यानगर........**अर्जदार**

**विरुध्द**........१. वैभव जयराम कोकतरे, वय २५, २. श्रध्दा उत्तम घारे, वय २३, ३. नंदीनी (बायसा) जयराम कोकतरे, वय सज्ञान, सा. वाला नं १ व २ रा. त्रिरत्न सदन, १०४, शिवमंदीर गल्ली, किसन नगर ३, वागळे इस्टेट, ठाणे, (म. कार्प) ठाणे, ४००६०४. सा वाला नं ३ रा. तेरुंगण, ता. अकोले, जि. अहिल्यानगर.....**सामनेवाले**

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात चौ. अर्ज दाखल केला आहे. अर्जदार व सा वाले नं ३ यांचे पती व सा वाला नं १ व २ यांचे वडील मयत जयराम लक्ष्मण कोकतरे हे दि. ११/१०/२०२४ रोजी डॉ. गोडबोले हॉस्पीटल, ठाणे येथे मयत झाले. ते हयात असताना पोलीस म्हणून नोकरी करत होते. यांचे मृत्युनंतर अर्जदार यांनी वारस नोंद करणेसाठी कुटुंब निवृत्ती वेतन (पेन्शन) मिळणेसाठी व इतर रकमांसाठी व लाभ मिळणेसाठी अप्पर पोलिस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग ठाणे यांचेकडे मागणी केली असता त्यांनी मयत जयराम लक्ष्मण कोकतरे हयांचे मूत्यूंनंतर त्यांचे मागे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत याबाबतचा वारस दाखला मागितला. त्यामुळे मयत जयराम लक्ष्मण कोकतरे यांचे वारस म्हणून नोंद होवून मिळणेकरिता अर्जदार व सामनेवाले नं १ ते ३ हे मयत जयराम लक्ष्मण कोकतरे यांचे कायदेशीर वारस आहेत व तसे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी अर्जदार हे मयत जयराम लक्ष्मण कोकतरे यांचे कायदेशीर वारस नाही. त्यांचेशिवाय दुसरे कोणी वारसदार आहे असे कोणाचे म्हणणे असल्यास अगर त्यात कोणाचा हितसंबंध असल्यास त्यांनी या न्यायालयात नेमलेली तारीख १८ / ०४/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता अथवा सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत आपण स्वतः अगर कायदेशीर वकीलामार्फत या अर्जात हजर होवून कळवाव्यात. अन्यथा कोणाचेही काही एक म्हणणे नाही असे समजून मे. कोर्ट अर्जदाराचा पुरावा ऐकुन घेवुन कायदयाप्रमाणे पुढील योग्य तो आदेश पारीत करतील. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. ०४/०३/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
**कामगिरी क्लर्क** — **सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, राजूर**

# सोबलेवाडीत 'खेळ पैठणी'चा गुरुवारी कार्यक्रम

पारनेर : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील सोबलेवाडी येथे आगामी गुरुवार दि. ५ मार्च २०२६ रोजी भव्य 'हळदी-कुंकू' समारंभ आणि क्रांतीनाना मळेगावकर यांचा न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जय जिजाऊ बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या नाशिक जिल्हा अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्या सुनितााताई सोबले यांच्या संकल्पनेतून हा सोहळा पार पडणार असून, यामध्ये तालुक्यातील महिलांना मोठ्या प्रमाणात बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे पहिल्या सात विजेत्यांना मिळणारी मानाची पैठणी आणि भरघोस बक्षिसे. यामध्ये प्रथम क्रमांकासाठी इलेक्ट्रिक बाईक, द्वितीय क्रमांकासाठी फ्रिज आणि तृतीय क्रमांकासाठी टीव्ही देण्यात येणार आहे. त्यासोबतच शिलाई मशीन, मोबाईल, सोन्याची नथ आणि चांदीचा छल्ला अशी आकर्षक बक्षिसे अनुक्रमे चौथ्या ते सातव्या क्रमांकाच्या विजेत्यांना पैठणीसह प्रदान केली जातील. विशेष म्हणजे,




- कार्यक्रमात महिलांसाठी भरघोस बक्षिसे
- आयोजक सुनिताताई सोबले यांची माहिती
- होम मिनिस्टर फेम क्रांतीनाना मळेगावकर कार्यक्रमाचे आकर्षण

या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला आयोजकांतर्फे आकर्षक साडी भेट दिली जाणार आहे. कार्यक्रमात केवळ मुख्य स्पर्धाच नव्हे, तर २१ विविध वस्तूंचा 'बंपर लकी ड्रॉ' देखील काढला जाणार आहे. यामध्ये पिठाची गिरणी, स्मार्ट वॉच, मिक्सर, डिनर सेट, इस्त्री आणि मोबाईल अशा गृहोपयोगी वस्तूंचा समावेश आहे. हा सोहळा गुरुवारी सायंकाळी ५ वाजता हळदी-कुंकू समारंभाने सुरू होईल आणि त्यानंतर रात्री १० वाजेपर्यंत 'होम मिनिस्टर'चा खेळ रंगणार आहे.

# 'राजदेवांसारखे सारखे कार्यकर्ते प्रत्येक गावात हवेत!'

**खा. नीलेश लंके यांची अपेक्षा : वाढदिवसानिमित्त रक्तदान, नेत्रतपासणी व वृद्धांना काठ्यांचे वाटप**

नांदूरपठार : (समर्थ गांवकरी)



"प्रत्येक गावात रविंद्र राजदेव यांच्यासारखा कार्यकर्ता उभा राहिला, तर तालुक्यात आरोग्य, शिक्षण आणि सर्वसामान्यांचा एकही प्रश्न शिल्लक राहणार नाही," असे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले. नांदूरपठारचे माजी सरपंच रविंद्र राजदेव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिर, डोळे तपासणी शिबिर आणि वृद्धांना काठ्यांचे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी पारनेरच्या नगराध्यक्ष विद्याताई कावरे ,उपनगराध्यक्ष सुप्रियाताई शिंदे ,पंचायत समिती सदस्य जुन्नर शांताराम दाते,नांदूर पठार सेवा सोसायटी चे व्हा. चेअरमन बाळू चौधरी यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी दीपक लंके ,राणीताई लंके ,मोहनराव रोकडे ,अशोक घुले ,किरण ठुबे ,प्रसाद नवले , महेंद्र गायकवाड, दिनेश चौगुले ,पोपटराव गुंड ,बाळासाहेब गुंड ,दिपालीताई औटी ,सारिकाताई आग्रे ,प्रकाश चिकने,गंगाराम चिकने,पांडुरंग येवले ,

अर्जुन भालेकर ,योगेश मते , डॉ बाळासाहेब कावरे , बाळासाहेब पुंडे ,बापूसाहेब ठुबे, अजित भाईक, हरिभाऊ आहेर ,नारायण राजदेव , भानुदास आग्रे ,जयराम चौधरी ,दिनेश आग्रे ,मदन देशमाने ,दत्ता चौधरी गटातील सर्व आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक सोनिया राजदेव यांनी तर आभार रविंद्र राजदेव यांनी मानले. वाढदिवस म्हटला की डीजे, फटाके आणि बॅनरबाजी अशी परंपरा रूढ झाली आहे. मात्र राजदेव यांनी वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, नेत्रतपासणी आणि वयोवृद्धांना आधारासाठी काठ्यांचे वाटप करून समाजोपयोगी संदेश दिला. "येथे संकलित होणाऱ्या एका रक्तपिशवीमुळे एक जीव वाचतो, त्याचे कुटुंब वाचते," असे सांगत खा. लंके यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. "एखाद्या व्यक्तीला सामान्य मदत आठ दिवसांनी दिली तरी चालते; मात्र वैद्यकीय उपचारासाठी मदत तात्काळ लागते. आरोग्य आणि शिक्षणासाठी विलंब चालत नाही," असे स्पष्ट करत त्यांनी राजदेव यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. "आरोग्य-शिक्षणासाठी तत्परतेने धावणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रविंद्र राजदेव," असे ते म्हणाले.

जिल्हा परिषद निवडणुकीच्या संदर्भात बोलताना खा. लंके यांनी मिश्किल शैलीत वातावरण हलके केले. "अनेकांनी रविंद्र राजदेव यांचा विचार करा असे सांगितले, तर काहींनी त्यांच्या पत्नी सोनिया यांची शिफारस केली. तुम्ही दोघांनी ठरवा माझा की तुझा नंबर? एकमत न झाल्यास छापा-काटा करा, नाहीतर 'शोले' चित्रपटातील सिक्का आणा!" असे म्हणताच उपस्थितांत एकच हशा पिकला.

"समय से पहले और भाग्य से अधिक किसी को कुछ नहीं मिलता. मात्र कष्ट करत राहा; कर्म तुमच्यासोबत असते," असे सांगत त्यांनी राजदेव दाम्पत्याच्या समाजकार्याचा गौरव केला. "राजकारणात अनेक जण निवडणुकीपुरते फिरतात. निवडणूक झाली की लोकांना नमस्कारही करत नाहीत. मात्र राजदेव सरपंचपदापासून सातत्याने काम करत आहेत.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१३/२०२५ — अकोले दि. २७/०२/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. लक्ष्मण दत्तु जाधव, रा. पिंपळदरी**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आजी कै. ठकुबाई शंकर जाधव यांचा मृत्यू दि. २२/०५/२००७** रोजी **मौजे पिंपळदरी** येथे झाला असुन त्यांच्या **आजीच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय पिंपळदरी**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. लक्ष्मण दत्तु जाधव, रा. पिंपळदरी**, ता. अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांची आजी कै. ठकुबाई शंकर जाधव यांचा मृत्यू दि. २२/०५/२००७** रोजी **मौजे पिंपळदरी** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय पिंपळदरी**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २७/०२/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
**कामगिरी क्लर्क** — **तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# ओतूर बनलं अवैध दारू विक्रीचा बालेकिल्ला की दारूचा अड्डा?

## ओतूर व आजुबाजूचा गाव खेड्यांच्या परिसरात उघडउघड अवैध दारू विक्रीवर प्रश्नचिन्ह

नाशिक : (समर्थ गांवकरी)




कळवण तालुक्यातील ओतूर व आजूबाजूचा परिसर सध्या देशी-विदेशी अवैध दारू विक्रीचा बालेकिल्ला बनल्याची धक्कादायक स्थिती समोर येत आहे. एकीकडे राज्यात दारूबंदी, अमली पदार्थांवर कारवाई आणि कायद्याची कडक अंमलबजावणी यावर मोठमोठ्या घोषणा होत असताना प्रत्यक्षात मात्र डांबरी रस्त्याच्या कडेला दिवसभर खुलेआम दारू विक्री सुरू असल्याचे चित्र ओतूर व आजुबाजूचा परिसर दिसत आहे.

पंधरा दिवसांपूर्वी मंत्री गिरीश महाजन नाशिक दौऱ्यावर आले असताना त्यांनी माध्यमांशी बोलताना "नाशिक जिल्हा हा कायद्याचा बालेकिल्ला आहे, आमची बारीक नजर आहे," असे ठामपणे सांगितले होते. मात्र ओतूर परिसरातील वास्तव वेगळेच प्रश्न उपस्थित करत आहे. जर प्रशासनाची नजर इतकी बारीक असेल, तर मग रस्त्यालगत उघडपणे होणारी देशी-विदेशी दारूची विक्री कोणाच्या छत्रछायेखाली सुरू आहे, स्थानिक नागरिक ओतूर कुंडाणे राज देवरे असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत. राज्य शासनाने दारूविक्री व उत्पादनावर नियंत्रण ठेवण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाची स्वतंत्र यंत्रणा उभी केली आहे. तरीदेखील स्थानिकांच्या म्हणण्यानुसार कारवाई केवळ कागदावरच दिसते. "सकाळी धाड टाकली जाते, पण सायंकाळी त्याच ठिकाणी पुन्हा दारू विक्री सुरू होते," असे नाव न छापण्याच्या अटीवर एका नागरिकाने सांगितले. ही परिस्थिती केवळ कायद्याला आव्हान देणारी नाही, तर प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. गावातील महिलांमध्ये विशेषतः नाराजीचे वातावरण आहे. अवैध दारूमुळे घरांमध्ये भांडणे, आर्थिक हालअपेष्टा आणि तरुण पिढीचे बिघडलेले आयुष्य याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांवरही या वातावरणाचा विपरीत परिणाम होत असल्याचे पालक सांगतात. "गावात भीतीचे वातावरण आहे; विरोध केला तर त्रास होईल," अशी भावना काहींनी व्यक्त केली. ओतूर परिसर हा शेतीप्रधान व शांततेसाठी ओळखला जाणारा भाग. मात्र आज तो अवैध दारू विक्रीमुळे बदनाम होत असल्याची खंत नागरिक मांडत आहेत. शासन आणि प्रशासनाने केवळ घोषणांवर न थांबता सातत्यपूर्ण, कठोर आणि पारदर्शक कारवाई करावी, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे.

प्रश्न सरळ आहे — कायद्याचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा नाशिक जिल्हा खरोखरच कायद्याच्या अंमलबजावणीत मजबूत आहे का, की ओतूरसारख्या भागात तो अवैध दारू विक्रीचा बालेकिल्ला बनत चालला आहे? आता सर्वांच्या नजरा प्रशासनाच्या पुढील पावलांकडे लागल्या आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अ‍ॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# उधारीच्या आमदारकीवर जगू नका, ताकद असेल तर राजीनामा देऊन पुन्हा निवडून या

## सुजित झावरे पाटलांचे आ. काशिनाथ दातेंना खुले आव्हान : पारनेर नगरपंचायतमध्ये सत्कार समारंभ तसेच पत्रकार परिषदेचे आयोजन

पारनेर : (समर्थ गांवकरी)

ज्याने काम केले, त्याचे श्रेय त्याला मिळालेच पाहिजे. ज्यांना सात-आठ वर्षांत जमले नाही, ते काम आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून करून आणले. आमदार काशिनाथ दाते यांनी उधारीच्या आमदारकीवर जगू नये; ताकद असेल तर आमदारकीचा राजीनामा द्या आणि पुन्हा निवडणूक लढवून दाखवा, अशा कडक शब्दांत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी आमदार काशिनाथ दाते यांचे नाव न घेता त्यांच्यावर तोफ डागली.



पारनेर नगरपंचायतीच्या वतीने नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि नगरसेवकांच्या उपस्थितीत सुजित झावरे पाटील यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके, नगराध्यक्ष डॉ. विद्या कावरे, शिवसेना तालुकाप्रमुख अरुणराव ठाणगे, ज्येष्ठ नेते खंडू भुकण, डॉ. बाळासाहेब कावरे, निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष सतीश भालेकर, रवींद्र गायखे, शिवसेना महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख डॉ. कोमल भंडारी, योगेश मते, भूषण शेलार, आदी उपस्थित होते. पारनेरच्या विकास आराखड्याला (DPR) मंजुरी मिळवून दिल्याबद्दल हा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना झावरे पाटील यांनी तालुक्यातील श्रेयवादाच्या लढाईवर सडेतोड भाष्य केले. झावरे पाटील म्हणाले की , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारनेरमधील प्रवेश सोहळ्यात डीपीआर मंजुरीचे आश्वासन दिले होते. आचारसंहितेमुळे या कामाला विलंब झाला , मात्र पाठपुरावा करून मी ही फाईल मार्गी लावली. मी सोशल मीडियावर पीडीएफ टाकली तर आमदारांच्या पोटात गोळा आला. त्यांना डीपीआर मंजूर झाल्याचा आनंद नाही, तर तो सुजित झावरे यांनी मंजूर केला याचे दुःख आहे. ज्यांना साधे ग्रामपंचायत सदस्य होण्याची लायकी नाही, त्यांना अजित पवार आणि सुजय विखे यांच्या सांगण्यावरून आम्ही मदत केली आणि आमदार केले. आज तेच उपकाराची भाषा विसरले आहेत, अशी घणाघाती टीका त्यांनी केली. पारनेर शहराच्या पाणी योजनेबाबत बोलताना सुजित झावरे पुढे म्हणाले की, विकास आराखडा मंजूर नसल्याने पाणी योजनेत तांत्रिक अडचणी येत होत्या. आता तो मार्ग मोकळा झाला आहे. येत्या काळात मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांच्या माध्यमातून पारनेरकरांच्या सेवेत ही पाणी योजना कार्यान्वित करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार दाते यांचा उल्लेख 'गोड बोलणारा पण मनात विष असलेला माणूस' असा करत झावरे पाटील यांनी संताप व्यक्त केला . निवडणुकीच्या काळात ग्रामपंचायत सदस्य नसलेल्या माझ्या पाया पडायला हे येत होते . विधानसभा निवडणुकीत ज्यांच्याकडे १०-१५ गावांत बुथ लावायला माणसे नव्हती, त्यांची व्यवस्था आम्ही केली. आम्ही एका विषारी झाडाला पाणी घातले, याची आज खंत वाटते,असेही ते म्हणाले.

यावेळी त्यांनी माजी नगराध्यक्ष अशोक चेडे यांच्यावरही टीका केली. चेडे यांना डीपीआरचा लॉंग फॉर्म तरी माहिती आहे का? कोरोना काळात चढ्या भावाने माल विकणाऱ्या वृत्तीचा वापर करून आमदार आपली पोळी भाजून घेत आहेत. येणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीत जनताच त्यांना चोख उत्तर देईल, असे शिवसेना नेते सुजित झावरे यांनी ठणकावून सांगितले.

माजी आमदार विजय औटी यांनी कधीही खालच्या पातळीवर टीका केली नाही दुसऱ्याच्या कामाचे श्रेय घेतले नाही असेही झावरे बोलताना यावेळी म्हणाले आहेत. या सत्कार प्रसंगी नगरपंचायतीचे पदाधिकारी, सत्ताधारी नगरसेवक आणि महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. झावरे पाटील यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे पारनेरच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

# ८ ते २२ मार्च दरम्यान 'जल महोत्सव' साजरा होणार




ठाणे : (समर्थ गांवकरी)

ग्रामीण पाणी पुरवठा व्यवस्था अधिक शाश्वत, सक्षम व लोकसहभागावर आधारित करण्याच्या उद्देशाने दि. ८ ते २२ मार्च या कालावधीत जिल्ह्यात 'जल महोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'नदी उत्सव'च्या धर्तीवर 'जल उत्सव' साजरा करण्याची परंपरा विकसित करण्यावर भर दिला होता. त्यानुसार राष्ट्रीय पेयजल विभाग, केंद्र शासन व NITI Aayog यांच्या सहकार्याने २०२४ मध्ये देशातील २० महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर जल उत्सव राबविण्यात आला होता. त्यास मिळालेल्या यशस्वी प्रतिसादानंतर यंदा हा महोत्सव देशभर आयोजित करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत वैयक्तिक नळजोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करणे हे जल जीवन मिशन या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या योजनांचे उन्नतीकरण करून स्टँड पोस्ट नळ पाणीपुरवठा योजना तसेच दरडोई किमान ४० लिटर प्रतिदिन पूर्ण झालेल्या योजनांना ५५ लिटर प्रतिदिन क्षमतेनुसार सुधारित करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यातील शाळा, अंगणवाड्या, अनुदानित आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहांना नळजोडणी सुविधा देण्यात येत असून, एकाकी व आदिवासी वाडी-पाड्यांसाठी सौरऊर्जा आधारित नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहेत. 'जल महोत्सव' राष्ट्रीय, राज्य आणि ग्राम अशा तीन स्तरांवर आयोजित करण्यात येणार आहे. ग्राम व पंचायत समिती स्तरावर 'लोकजल उत्सव' साजरा करण्यात येईल, जो पूर्णपणे लोकसहभागावर आधारित असेल.

# शहर शिवसेनेची मागणी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

दि. ६ मार्च रोजी तिथी प्रमाणे शिवजयंती उत्सव असून मिरवणूक कालमर्यादा दोन तास शिथील करुन रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक मिरवणुकीस परवानगी देण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेच्या (शिंदे गट) वतीने करण्यात आली. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, गटनेते दत्तात्रय कावरे, विक्रम राठोड, दत्ता जाधव, परेश लोखंडे, काका शेळके, अरुण झेंडे ,प्रताप गडाख आदी उपस्थित होते. कदम म्हणाले की, दि. ६ मार्च रोजी तिथीप्रमाणे शिवजयंती उत्सव असून नगर शहर शिवसेना सालाबाद प्रमाणे शिवजयंती उत्सव साजरा करणार आहे.

# भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर काम बंद आंदोलन प्रारंभ

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर आजपासून राज्यात तसेच नगर मध्ये कामबंद आंदोलन सुरु करण्यात आले आहे. भूमि अभिलेख विभागातील सर्वेअर यांना पोलिस बंदोबस्ता शिवाय मोजणी करणे किती जोखमीचे आहे हे अलिकडील काही गंभीर घटनांवरुन आपले निदर्शनास आले असेलच. त्याच प्रमाणे विभागातील कर्मचाऱ्यांचे कामकाज हे लिपीक संवर्गाचे नसून तांत्रिक दर्जाचे व क्षेत्रीय स्तरावरील अतिशय जोखमीचे आहे. असे वर्षानुवर्षे शासन प्रशासन यांचे निदर्शनास आणून देत आहोत, परंतू त्याकडे हेतू पुरस्सर दुर्लक्ष होत आहे. या अनुषंगाने दि. १८ फेब्रुवारी २०२६ पासून भूमि अभिलेख कर्मचारी कृती समितीने संपूर्ण राज्यभर असहकार आंदोलन (फक्त कार्यालयीन कामकाजाचा निपटारा करणे,




मोजणी प्रकरणातील अभिलेख अदयावत करणे) । अर्जित रजा घेणे / बेमुदत कामबंद आंदोलन करणे अशा प्रकारे शासनाचे सनदशिर मार्गाने लक्ष वेधण्यासाठी टप्पा टप्पाने आंदोलन घोषीत केले आहे. याबाबतची रितसर नोटीस सर्व संबधीताना यापुर्वीच संदर्भिय पत्राने देणेत आलेली आहे. मागण्या मान्य न झाल्यामुळे आजपासून नगर मध्ये कामबंद आंदोलन सुरु करण्यात आले आहे तरी आमच्या मागण्यांचा सहानुभुतीपुर्वक विचार करावा असे आवाहन सरकारला रवी डिक्रूज, विभागीय अध्यक्ष भूमि अभिलेख कर्मचारी संघटना नाशिक प्रदेश, नाशिक,उमेश कोदे, भूमि अभिलेख कर्मचारी संघटना सल्लागार अहिल्यानगर,प्रविण बोरुडे, सह-सचिव भूमि अभिलेख कर्मचारी संघटना अहिल्यानगर, प्रदीप अवचर,संघटक भूमि अभिलेख कर्मचारी संघटना, मिलिंद भिंगारदिवे,संग्राम लवांडे,शशिकांत धस, अविनाश ठोकळ आदींसह धरणे धरून बसलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी केले आहे.

# शासकीय कर्मचाऱ्यांचे गाव म्हणून किनिस्ते गावाची जुनी ओळख आजही कायम



पालघर : (समर्थ गांवकरी)

आज धुळीवंदन व होळी च्या निमित्ताने किनिस्ते गावातील नवनियुक्त कर्मचारी व व्यावसायिकांचा सन्मान सोहळा ग्रामपंचायत किनिस्ते व टिम एन आर डी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मोखाडा पंचायत समितीचे माजी सभापती प्रदीप वाघ यांनी आपल्या भाषणात सांगितले की मोखाडा तालुक्यात किनिस्ते गाव हे पुर्वी पासुन च कर्मचारी वर्गाचे गाव म्हणून ओळखले जाते, अनेक आदर्श शिक्षक या गावातुन निर्माण झाले आहेत, त्यामुळे मागील अनेक पिढ्या ह्या उच्चशिक्षित आहेत, सर्वाधिक शिक्षित लोक गावात आहेत.

आणि हिच परंपरा नव्या पिढीने जोपासत गावातुन जवळपास 85 तरुण तरुणी शिक्षक, आरोग्य सेवक, पोलीस, होमगार्ड अशा विविध शासकीय पदावर नव्याने रुजू झाले आहेत. कु.दुर्वेश दाते या तरुणाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगात चांगले यश संपादन केले आहे.

तर काहींनी डिजिटल प्रिंटिंग प्रेस,मेडीकल शॉप व्यवसाय सुरू केला आहे. अशा सर्व नवतरुणांचे यावेळी सन्मान पत्र,शाल देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला गावचे सरपंच योगेश दाते, उपसरपंच पंकज शिंदे, ग्रामपंचायत चे सर्व सदस्य व क्रिकेट टीम ने चांगले नियोजन केले होते. या कार्यक्रमा मुळे नवनिर्वाचित नोकरदार वर्गाला मोठा आनंद झाला असून अनेक तरुणांनी मनोगतातुन आयोजकांचे आभार मानले व अशा प्रकारे सत्कार केल्या मुळे मनस्वी आनंद झालेचे सांगितले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मोखाडा पंचायत समितीचे माजी सभापती प्रदीप वाघ, भाजपचे तालुकाध्यक्ष मिलिंद झोले, सरपंच योगेश दाते, उपसरपंच पंकज शिंदे, ग्रामपंचायत सदस्य बाळकृष्ण शिंदे,वाकडपाडा पोलीस पाटील विठ्ठल गोडे, माजी सरपंच संजय वाघ,माजी सरपंच मंगेश दाते, पोलीस पाटील गौतम शिंदे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हिरामण शिंदे, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश दाते, पांडुरंग सराई,राजाराम जोशी सर, प्रकाश मडके,ग्रामपंचायत चे सर्व सदस्य, गावातील अधिकारी, कर्मचारी जेष्ठ नागरिक, निवृत्त कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित नवनियुक्त कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# कुलूप तोडून २ लाख ९५ हजाराचा ऐवज लंपास

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी २ लाख ९५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. या प्रकरणी गोविंद बलराज बेहेल यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेहेल हे उपचारासाठी नाशिक येथे गेले होते, त्यामुळे त्यांचे घर काही काळ बंद होते. याच संधीचा फायदा घेऊन चोरट्यांनी घराचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला. घरामध्ये ठेवलेली ८० हजार रुपयांची रोख रक्कम, सोन्याच्या अंगठ्या, मंगळसूत्र, कर्णफुले, चांदीचे विविध दागिने व इतर मौल्यवान वस्तू असा एकूण २ लाख ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला. माहिती मिळताच बेहेल यांनी पोलिसांना कळवले. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी ठसे तज्ज्ञांच्या मदतीने तपासणी केली आहे.

# आर. एन. विद्यालयात विज्ञान प्रदर्शन व खाद्य मोहत्सव संपन्न

ठाणे : (समर्थ गांवकरी)

दिव्यात श्री साईबाबा चॅरिटेबल ट्रस्ट संचलित आर. एन. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, गणेश नगर येथे विज्ञान दिन व फूड फेस्टिव्हल मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. फूड फेस्टिवल मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने या उपक्रमात विद्यार्थ्यांनी घरच्या घरी विविध चविष्ट खाद्यपदार्थ पदार्थ तयार करून आणले होते. विद्यार्थ्यांना उद्योजकतेचा अनुभव मिळावा व स्वावलंबनाची जाणीव व्हावी यासाठी शाळेच्या परिसरात त्यांना विक्रीसाठी स्टॉल लावून देण्यात आले. फूड फेस्टिवलमध्ये पारंपरिक तसेच आधुनिक खाद्यपदार्थांची रेलचेल पाहायला मिळाली. वडापाव, पाणीपुरी, सँडविच, केक, मिठाई, ज्यूस , चॉकलेट सॅलड आदी पदार्थांना पालक व शिक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी ग्राहकांशी नम्रपणे संवाद साधत



विक्री कौशल्यही दाखवून दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संघभावना आणि आर्थिक व्यवहाराचे प्राथमिक ज्ञान विकसित झाले. तसेच विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित आकर्षक प्रात्यक्षिके व प्रकल्प सादर केले. विज्ञान प्रदर्शनामध्ये सौरऊर्जा, पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, रोबोटिक्स आदी विषयांवरील मॉडेल्स विशेष लक्षवेधी ठरले. विद्यार्थ्यांनी विज्ञान दिनाचे महत्त्व सांगणारी भाषणे, कविता तसेच विज्ञान विषयक प्रश्नमंजुषा स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला. उत्कृष्ट प्रकल्प सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवर्ग, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. विज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, संशोधन वृत्ती व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मुख्याध्यापकांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. उपस्थित पालकांनीही अशा उपक्रमांचे कौतुक करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. प्रसंगी दिव्यातील विविध शाळांतील संचालक, मुख्याध्यापक तसेच आर एन विद्यालयाचे संचालक नरेश पवार, अध्यक्षा रेश्मा नरेश पवार, मुख्याध्यक रश्मी सोहनी मॅडम, विनोद भगत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कु. पायल सोमनाथ नवले हिचा वाढदिवस साजरा होणार!

(समर्थ गांवकरी)

कु. पायल सोमनाथ नवले हिचा वाढदिवस गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी आनंदोत्सवात साजरा होणार आहे. यानिमित्त नवले परिवारात उत्साहाचे वातावरण असून वाढदिवसानिमित्त विशेष कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. कु. पायल या आपल्या कुटुंबीयांच्या लाडक्या असून अभ्यासू, मनमिळावू आणि जिद्दी स्वभावामुळे त्या सर्वांच्या आवडत्या आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र-मैत्रिणी व नातेवाईकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होणार आहे. घरगुती वातावरणात साध्या पण आनंददायी पद्धतीने वाढदिवस साजरा करण्यात येणार असून केक कापून आनंदोत्सव साजरा केला जाणार आहे. नवले परिवाराच्या वतीने कु.पायल यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, शैक्षणिक व वैयक्तिक



आयुष्यात भरघोस यश तसेच सर्व मनोकामना पूर्ण होण्यासाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत. कु. पायल सोमनाथ नवले यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

# दोन दिवसांत अतिक्रमणे हटवा, अन्यथा आमरण उपोषण : गोरख दळवी

## अखंड मराठा समाज, अहिल्यानगरचा साखळी उपोषणास पाठिंबा




जामखेड : (समर्थ गांवकरी)

जामखेड शहरातील अतिक्रमण हटविण्यासाठी सुरू असलेले साखळी उपोषण व आंदोलन शांततेच्या मार्गाने सुरू आहे. मात्र प्रशासनाने या आंदोलनाची दखल घेऊन शहरातील अनधिकृत अतिक्रमणे तातडीने हटवावीत, अन्यथा येत्या दोन दिवसांत कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयात आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा अखंड मराठा समाज, अहिल्यानगरचे गोरख दळवी यांनी दिला आहे.

जामखेड येथे सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी गेल्या सात दिवसांपासून तहसील कार्यालयासमोर शहर हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी साखळी उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी अखंड मराठा समाज, अहिल्यानगरच्या वतीने गोरख भाऊ दळवी, जगन्नाथ निमसे, गोरक्षनाथ पटारे, सोमनाथ गुंड, सागर भोसले, संदीप जगताप, गणेश नाईकनवरे, रत्नाकर दरेकर (काका), नितीन गव्हाणे, वैभव भोगाडे यांनी बुधवार, दि. ४ मार्च रोजी आंदोलनस्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शविला. यावेळी त्यांनी नायब तहसीलदार पांडुळे यांचीही भेट घेऊन सुरू असलेल्या साखळी उपोषणावर लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी केली. पुढे बोलताना गोरख दळवी म्हणाले की, जामखेड शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित असून त्यामुळे शहराच्या विकासात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी तहसील कार्यालयासमोर शांततेच्या मार्गाने साखळी उपोषण सुरू केले आहे.

या आंदोलनाला अखंड मराठा समाज, अहिल्यानगरचा जाहीर पाठिंबा असून या प्रश्नावर तोडगा निघावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांशीही चर्चा करण्यात येणार आहे. मात्र प्रशासनाने येत्या दोन दिवसांत शहरातील अतिक्रमण हटविण्याबाबत ठोस निर्णय घेतला नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयात आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा गोरख दळवी यांनी दिला. तसेच शासनाने या आंदोलनातील मागण्या मान्य केल्या नाहीत तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## साखळी उपोषणाला ग्रामपंचायतींचा पाठिंबा

जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण व कामातील अनियमिततेविरोधात समाजसेवक अवधूत पवार यांनी तहसील कार्यालयासमोर सुरू केलेल्या साखळी उपोषणाला जामखेड तालुक्यातील घोडेगाव व पाडळी ग्रामपंचायतच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला. यावेळी अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली.

# छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचा प्रथम वर्धापन दिन होणार दिमाखात साजरा

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शक्तिपीठ हे महाराष्ट्रातील पहिले भव्य-दिव्य छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर म्हणून राज्यभर ओळखले जात असून, या मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त दि. ५ व ६ मार्च रोजी अत्यंत भव्य, दिमाखदार आणि ऐतिहासिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिवक्रांती प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य तसेच छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शक्तिपीठ, मराडे पाडा यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा पार पडणार आहे. ग्रामीण भागातील शिवभक्त मावळ्यांच्या अथक परिश्रम, निष्ठा आणि शिवप्रेमातून उभारण्यात आलेले हे मंदिर आज संपूर्ण महाराष्ट्राच्या अभिमानाचे प्रतीक ठरत



आहे. स्वराज्याचे संस्थापक, पराक्रम आणि आदर्श राज्यकारभाराचे प्रेरणास्थान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या कार्याचा वारसा भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे मंदिर उभारण्यात आले आहे. मंदिराची भव्य वास्तुरचना, आकर्षक शिल्पकला, प्रशस्त सभामंडप आणि दिव्य वातावरण यामुळे राज्यभर या मंदिराची चर्चा सुरू असून बिदेशातील शिवप्रेमींकडूनही या उपक्रमाचे कौतुक होत आहे. शिवक्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांच्या संकल्पना, नेतृत्व आणि दूरदृष्टीतून साकारलेल्या या मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त दोन दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक कार्यक्रमांची विस्तृत आखणी करण्यात आली आहे. पहिल्या दिवशी वेदमंत्रांच्या गजरात महाअभिषेक, विशेष पूजन, हरिपाठ, कीर्तन व भजन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच शिवचरित्रावर आधारित प्रेरणादायी व्याख्यानमाला घेण्यात येणार आहे. दुसऱ्या दिवशी शिवजयंतीचे औचित्य साधून भव्य मिरवणूक, ढोल-ताशांच्या गजरात स्वागत सोहळा, युवकांसाठी प्रेरणादायी कार्यक्रम, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार सोहळा पार पडणार आहे. मंदिर परिसर आकर्षक विद्युत रोषणाई, पारंपरिक सजावट, फुलांची आरास आणि भगव्या ध्वजांनी सजविण्यात येणार असून संपूर्ण परिसरात शिवमय वातावरण निर्माण होणार आहे. हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत हा सोहळा ऐतिहासिक ठरणार असल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांतून तसेच बाहेरगावाहूनही शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. हा वर्धापन दिन सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, शिवसंस्कार दृढ करणारा, युवकांना राष्ट्रप्रेम व स्वाभिमानाची प्रेरणा देणारा आणि समाजात एकात्मतेचा संदेश देणारा उत्सव ठरणार आहे, असे आयोजकांनी नमूद केले आहे.

## समर्थमध्ये तीन दिवसीय ताण-तणाव व्यवस्थापन व व्यसनमुक्ती कार्यशाळा संपन्न

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे राष्ट्रीय सेवा योजना व समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स,बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने "तीन दिवसीय विद्यापीठस्तरीय युवक–युवती उन्नयन : ताणतणाव व्यवस्थापन व व्यसनमुक्ती" या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेत विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेतील १०० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स चे प्राचार्य डॉ. उत्तम शेलार डॉ. लक्ष्मण घोलप,डॉ.शरद पारखे तसेच विविध विभागातील प्राचार्य उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट चे प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे यांनी आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना ताणतणाव,मानसिक दबाव व व्यसनांच्या आकर्षणाला सामोरे जावे लागत असल्याचे सांगून अशा कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले.यामध्ये जी.एम.आर.टी. खोडदचे वरिष्ठ शास्त्रज्ञ सचिन शेरकर यांनी ताणतणावाची कारणे याविषयावर मार्गदर्शन केले.कामाचा ताण,कौटुंबिक समस्या,आर्थिक अडचणी,झोपेचा अभाव,चिडचिड,रक्तदाब वाढणे यांसारख्या ताणतणावाच्या लक्षणांची माहिती देत त्यांनी (Avoid, Alter, Accept,Adopt) च्या माध्यमातून ताणतणाव कसा नियंत्रित करता येतो हे स्पष्ट केले. त्यानंतर डॉ.अरुण गुळवे यांनी योग,प्राणायाम,मेडिटेशन तसेच नियमित व्यायामाचे शारीरिक व मानसिक फायदे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे समजावून सांगितले.

## महिला दिनी नवनिर्वाचित महापौर व नगरसेविकांचा भव्य सत्कार

### सौ. शालिनी ताई वाबळे यांचा पुढाकार; प्रभाग क्र. २ व ३ मधील महिलांची मोठी उपस्थिती



**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सौ. शालिनी मनसुख वाबळे यांच्या तर्फे नवनिर्वाचित महापौर व नगरसेविकांचा सत्कार समारंभप्रसंगी महापौर ज्योती गाडे, नगरसेविका संध्या पवार नगरसेविका रोशनी त्रिंबके, गौरी बोरकर,शहर राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्ष श्रीमती रेश्मा आठरे, माजी नगर सेविका शोभा बोरकर, सौ. शालिनी वाबळे, छाया राजपूत, सविता मोरे, सौ. राजश्री शितोळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला प्रभाग क्र. २ व ३ मधील नगरसेविका, महिला पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. महिलांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत नारी शक्तीचा गौरव केला. कार्यक्रमात सौ. शालिनी ताई वाबळे यांच्या सामाजिक कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. स्थानिक निवडणुकीतून माघार घेऊन त्यांनी दिलेला जाहीर पाठिंबा तसेच प्रभागातील विकासासाठी त्यांनी केलेल्या विविध उपक्रमांचे उपस्थितांनी कौतुक केले. प्रभाग क्र. ३ मधील सामाजिक कार्यामुळे त्यांना महिलांमध्ये विशेष मान व पाठिंबा मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नवनिर्वाचित महापौर सौ. ज्योती गाडे यांनी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्व महिलांना शुभेच्छा देत नारी शक्तीचे महत्त्व अधोरेखित केले."समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध केली असून त्यांच्या सहभागामुळे समाज अधिक सक्षम होत आहे," असे त्यांनी सांगितले. तसेच परिसरातील नागरिकांनी मांडलेल्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.सौ. शालिनी ताई वाबळे यांनी आपल्या मनोगतातून सर्व महिलांचे आभार मानले. "महिलांनी एकत्र येऊन समाजाच्या विकासासाठी काम केले तर अनेक सकारात्मक बदल घडू शकतात.

## निशुल्क ग्रंथालय सदृश अभ्यासिकेचा लाभ घ्यावा

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नांदेड अंतर्गत जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी निशुल्क ग्रंथालय सदृश अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. या अभ्यासिकेत स्पर्धा परीक्षा, बँकिंग, रेल्वे भरती तसेच विविध स्पर्धात्मक परीक्षांसाठी आवश्यक संदर्भ पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यामध्ये चालू घडामोडी, वर्तमानपत्रे, विविध मासिके आदी साहित्याचा समावेश आहे. तसेच सुशिक्षित युवक-युवतींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यासाठी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबिरे तसेच ऑनलाईन व ऑफलाईन समुपदेशन कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येतात.

## कराळे क्लब हाऊसमध्ये पै. लक्ष्मण धनगर यांचा दिमाखदार सत्कार

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

कराळे क्लब हाऊसमध्ये जुन्नर तालुक्यातील माणकेश्वर केसरी कुस्ती स्पर्धेत खुल्या गटातून प्रथम क्रमांक पटकावणारे पै. लक्ष्मण धनगर यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून

भारतीय जनता पार्टी प्रदेश उपाध्यक्ष व माजी खासदार

डॉ. सुजय विखे पाटील उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पै. धनगर यांना सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

माणकेश्वर केसरी, जुन्नर (जिल्हा पुणे) येथे पार पडलेल्या कुस्ती स्पर्धेत खुल्या गटातून अव्वल येत पै. लक्ष्मण धनगर यांनी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.





कार्यक्रमास पै. शिवाजीराव कराळे, माजी महापौर व नगरसेवक बाबासाहेब वाकळे, करण कराळे, उदय कराळे, पुष्कर कुलकर्णी, राम कराळे, गजानन कराळे, महेश कराळे, श्रीनिवास कराळे, रवींद्र वाकळे, डॉ. पठारे, डॉ. कदम, डॉ. साळवी, अविनाश जाधव, संदीप आडोळे, सर्वेश देशमुख, भरत चिपाडे, प्रसाद गांगरडे, अमोल दंडवते, शुभम वाकळे, अभिषेक तांबे, रवींद्र गोरे, अभिजित म्हस्के, नयन दंडवते, जगन्नाथ भगत, अभिजीत पाटील तसेच सर्व सभासद व स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुसळा धनगर, नवनाथ धनगर, दीपक धनगर, राजू धनगर, तात्या धनगर, पांडुरंग धनगर व श्रीनाथ धनगर यांच्यासह धनगर समाजातील बांधवांची उपस्थिती लक्षणीय होती.

खासदार डॉ. सुजय विखे पाटील यावेळी बोलताना म्हणाले, "कुस्ती हा आपल्या महाराष्ट्राच्या मातीतला खेळ आहे. पै. लक्ष्मण धनगर यांनी जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर माणकेश्वर केसरी किताब जिंकत जुन्नर तालुक्याचे नाव उंचावले आहे. ग्रामीण भागातील तरुणांनी खेळात पुढे येऊन राज्य आणि देश पातळीवर यश संपादन करावे. अशा खेळाडूंना आवश्यक ती मदत व प्रोत्साहन देण्यासाठी आपण कायम तत्पर राहू."

## आमदार नवघरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश!

- सिद्धेश्वर उपसा जलसिंचन योजनेला मंजुरी हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली

**वसमत: (समर्थ गांवकरी)**

विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत आनंदाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सिद्धेश्वर उपसा जलसिंचन योजनेला अखेर शासनाची मान्यता मिळाली असून, या यशामागे आमदार राजुभैया नवघरे यांचा सातत्यपूर्ण आणि ठाम पाठपुरावा निर्णायक ठरला आहे.

ही योजना कार्यान्वित व्हावी यासाठी आमदार नवघरे यांनी मंत्रालय स्तरावर अनेक बैठका घेतल्या. दिवंगत उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या विषयावर सविस्तर चर्चा झाली होती. तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे



पाटील यांच्याकडेही वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला.

हिंगोली जिल्हा हा राज्यपाल सिंचन अनुशेषात मोडत असल्याने या भागातील सिंचन प्रकल्पांना प्राधान्य देणे आवश्यक होते. हा अनुशेष दूर करून वसमत मतदारसंघातील सिंचन क्षेत्र वाढवण्याचा निर्धार आमदार नवघरे यांनी केला होता. अखेर त्या प्रयत्नांना यश आले असून, सिद्धेश्वर उपसा जलसिंचन योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषणालाही मंजुरी देण्यात आली आहे.

या योजनेमुळे वसमत मतदारसंघातील पांगरा शिंदे सर्कल, अंबा सर्कल, शिरडशहापूर सर्कल, पुरजल सर्कल आणि पूर्णा सर्कल मधील अनेक गावे सिंचनाखाली येणार आहेत. अंदाजे ३,००० ते ४,००० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून, वसमत तालुक्यातील २५ पेक्षा अधिक आणि औंढा तालुक्यातील १५ गावांतील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

या योजनेला मंजुरी मिळण्यात स्वर्गीय अजितदादा पवार यांचे मोठे योगदान होते. मात्र, आज ते आपल्या सोबत नसल्याची खंत सर्वांना आहे. यापूर्वीही त्यांनी पूर्णा नदीवरील पोटा, पिंपळगाव कुटे आणि परळी दथरथे येथील बंधाऱ्यांना संभाजीनगर येथील कॅबिनेट बैठकीत मंजुरी दिली होती. त्या कामांना सध्या गती मिळाली आहे.

सिद्धेश्वर उपसा जलसिंचन योजना पूर्णत्वास गेल्यानंतर मतदारसंघातील सिंचन क्षमतेत लक्षणीय वाढ होणार असून, शेती उत्पादनात वाढ, दुबार पिकांची संधी आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल होणार आहे.

आमदार राजुभैया नवघरे यांच्या अथक प्रयत्नांमुळे या महत्त्वाच्या योजनेला हिरवा कंदील मिळाला असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वसमतच्या विकासासाठीचा हा एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे.

## समाधान शिबीर अभियानाचे आयोजन

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

लोहा तालुक्यात 7 मार्च ते 8 मे 2026 याकालावधीत छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान" टप्पा 1 चे मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी परिसरातील नागरिकांनी या शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राहून, आपल्या प्रलंबित कामाचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी केले आहे. त्यानुसार लोहा तालुक्यात 7 मार्च रोजी सोनखेड याठिकाणी सामान्य जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी लोहा प्रशासनाच्यावतीने" छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान" टप्पा 1 चे आयोजन करण्यात आले आहे.

## समाजातील गरजू व्यक्तींना मदत करणे हीच खरी जबाबदारी अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर यांचे प्रतिपादन

### दिव्यांगांसाठी किराणा वाटप, समाजसेवकांच्या सहकार्याने गरजू बांधवांना मदत

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

संदीप उर्मुडे, सचिन उर्मुडे, सुनील मांगुळकर, टेमक सर आणि अश्विनी आव्हाड यांनी एकत्र येऊन दिव्यांगांना किराणा वाटप केले. हा उपक्रम गरजू व्यक्तींना आधार देण्याच्या उद्देशाने आयोजित केला गेला.अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर, गोरख दरंदले,अनिल चाबूकस्वार, राजेंद्र फाळके, गणेश जाधव, आशिष रानावरे, अनिता शेळके आणि बाबासाहेब पाठे आदी मान्यवर उपस्थित होते.

संभाजी भोर म्हणाले, "समाजातील गरजू व्यक्तींना मदत करणे हीच खरी जबाबदारी आहे. आजच्या कार्यक्रमाने आपल्याला एकत्र येऊन मदत करण्याची संधी मिळाली आणि याचा आनंद खूप मोठा आहे."सर्वांच्या सहकार्यामुळे





हा उपक्रम पार पडला आणि आयोजकांनी भविष्यात असेच उपक्रम सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

## 'विशेष शिवआरोग्य संवत्सर योजना' कार्यान्वित!

**जखणगाव: (समर्थ गांवकरी)**

आरोग्यदायी गाव म्हणून राज्यात ओळख असलेल्या जखणगाव येथे शिवजयंतीपासून पुढील शिवजयंतीपर्यंत 'विशेष शिवआरोग्य संवत्सर योजना' राबविण्यात येत आहे. ग्रामसंसद कार्यालय, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आणि बॉम्बे नर्सिंग होम अॅक्टअंतर्गत नोंदणीकृत स्थानिक हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत गावातील प्रत्येक नागरिकाकडून वर्षासाठी ५०० रुपये किंवा पाच पायल्या धान्य, २५ किलो फळे अथवा ५० किलो भाजीपाला यापैकी कोणतेही एक वार्षिक दान स्वीकारले जाणार आहे. त्याबदल्यात संबंधित नागरिकाला एक वर्ष संपूर्ण मोफत आरोग्यसेवा दिली जाणार



आहे. रक्त व लघवी तपासणी, डिजिटल एक्स-रे, ईसीजी, विविध औषधे, अँटिबायोटिक, सलाईन, इंजेक्शन्स तसेच बीपी, शुगर, दमा, संधिवात, हृदयरोग, मेंदूरोग आदी आजारांवरील उपचार या योजनेत समाविष्ट आहेत. ओपीडी व आयपीडी सेवा, प्रसूती सेवा आणि आपत्कालीन उपचारही मोफत दिले जाणार आहेत. आवश्यकतेनुसार नगर, पुणे आदी ठिकाणी तपासणीसाठी सवलतीची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. नोंदणीनंतर प्रत्येक नागरिकास विशेष आरोग्य कार्ड देण्यात येईल. कार्ड सादर केल्यास वर्षभर सर्व सेवा मोफत मिळणार आहेत. तरी सर्व ग्रामस्थांनी त्वरित आरोग्य उपकेंद्र, ग्रामपंचायत किंवा संबंधित हॉस्पिटलशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आखाती देशातील युद्धजन्य तणावाचे पडसाद नाशिकच्या नागरिक व शेतकऱ्यांवर

- खासदार राजाभाऊ वाजेंची केंद्र-राज्य सरकारकडे धाव
- आखाती देशातील युध्दजन्य स्थितीचा नाशिकच्या शेतकऱ्यांवर परिणाम, खासदार राजाभाऊ वाजेंनी सरकारकडे व्यक्त केली चिंता
- कांदा, द्राक्षाचे कंटेनर अडकले, नागरिकांचाही जीव टांगणीला; आखाती युद्धाचा नाशिकवर परिणाम

> आखाती देशात अडकलेले नागरिक, विद्यार्थी, कामगार यांच्याशी कुटुंबीयांचा संपर्क होण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहोत. त्यांना भारतात आणण्यासाठी परराष्ट्र खात्याशी सातत्याने संपर्कात आहे. यासह आता आपल्या शेतकरी व निर्यातदार यांच्यावर देखील मोठं संकट ओढवल आहे. त्याबाबत सरकारने मार्ग काढावा अशी अपेक्षा आहे. त्याचसाठी हा पाठपुरावा सुरू आहे.
>
> **- राजाभाऊ वाजे, खासदार, नाशिक**

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

इराण आणि इस्रायल–अमेरिका आघाडीमधील वाढत्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या युद्धजन्य तणावाचे पडसाद आता भारतासह महाराष्ट्रातही उमटण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी नाशिक जिल्ह्यातील नागरिकांची सुरक्षितता आणि कृषी निर्यातीवर होणाऱ्या संभाव्य परिणामाबाबत चिंता व्यक्त करत केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे. खासदार वाजे यांनी पंतप्रधान कार्यालय, परराष्ट्र मंत्रालय तसेच लोकसभेच्या परराष्ट्र व्यवहार समितीला ई-मेल तसेच पत्राद्वारे सविस्तर निवेदन पाठवले असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनाही स्वतंत्र पत्र लिहून या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहण्याचे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. आखाती देशातील जवळपास चौदा देशांमध्ये हा संघर्ष सुरू असून आखाती देशात किमान एक कोटीहून अधिक भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. रोजगार, व्यवसाय आणि इतर कारणांमुळे नाशिक जिल्ह्यातीलही मोठी संख्या या देशांमध्ये कार्यरत आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सुरक्षिततेबाबत कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे वाजे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे.

याचबरोबर या संघर्षाचा संभाव्य परिणाम कृषी निर्यातीवर होण्याची शक्यता देखील त्यांनी व्यक्त केली आहे. द्राक्षे, कांदा, डाळिंब, पपई, मनुका यांसारख्या कृषी उत्पादनांच्या निर्यातीसाठी नाशिक जिल्हा देशातील महत्त्वाचे केंद्र मानले जाते. दर महिन्याला हजारो टन नाशवंत शेतमाल आखाती देशांकडे निर्यात होतो. मात्र सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे समुद्री मार्गांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याने जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (JNPT) येथे मोठ्या प्रमाणात कृषी माल अडकून पडल्याची माहिती मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. यामुळे शेतकरी व निर्यातदारांमध्ये अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर खासदार वाजे यांनी केंद्र सरकारकडे काही महत्त्वपूर्ण उपाययोजनांची मागणी केली आहे. त्यामध्ये आखाती देशांमध्ये वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेवर सातत्याने लक्ष ठेवणे, आवश्यकतेनुसार तातडीच्या सूचना व हेल्पलाईन सुरू करणे, परिस्थिती बिघडल्यास नागरिकांच्या सुरक्षित स्थलांतराची पूर्वतयारी ठेवणे तसेच कृषी निर्यात सुरळीत राहावी यासाठी शिपिंग व बंदर प्राधिकरणांशी समन्वय साधून शेतकरी व निर्यातदारांना दिलासा देणाऱ्या उपाययोजना राबविणे यांचा समावेश आहे.

दरम्यान, महाराष्ट्र शासनानेही केंद्र सरकारशी समन्वय साधत नाशिक जिल्ह्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी अपेक्षा त्यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात व्यक्त केली आहे. आखाती देशातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर नाशिकसारख्या कृषीप्रधान जिल्ह्याच्या दृष्टीने या परिस्थितीकडे वेळेत लक्ष वेधण्याचा प्रयत्न खासदार वाजे यांनी केल्याने या विषयाकडे राष्ट्रीय पातळीवरही गांभीर्याने पाहिले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कोतुळमध्ये सहकाराचा नवा इतिहास





## यशोमंदिर पतपेढीच्या शाखेचा उद्‌घाटन सोहळा उत्साहात संपन्न!

**कोतुळ : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील कोतुळ येथे यशोमंदिर सहकारी पतपेढी मर्यादित यांच्या नूतन शाखेचा उद्‌घाटन सोहळा बुधवार, दि. ४ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. सहकार क्षेत्रातील विश्वासार्ह नाव असलेल्या या संस्थेच्या २४ व्या शाखेच्या प्रारंभामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या शाखेचे उद्‌घाटन मा. श्री. सिताराम पाटील गायकर (मा. अध्यक्ष व ज्येष्ठ संचालक, अहमदनगर जिल्हा बँक) यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक श्री. मधुकर दादा गायकर होते तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोतुळेश्वर देवस्थान ट्रस्टचे संचालक मा. रवी आरोटे यांनी केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मा. भास्करराव लोहकरे, मा. राजेंद्र पाटील देशमुख, मा. संजयशेठ देशमुख, मा. ॲड. नेताजी आरोटे, मा. डॉ. अभिजित देशमुख, मा. बाळासाहेब पवळे, मा. राजुशेठ पवळे, मा. निलेशशेठ हुले, मा. ॲड. के. बी. हांडे, मा. सयाजी पोखरकर, मा. किसन पोखरकर, मा. चंद्रकांत पोखरकर, मा. मनोज देशमुख, मा. प्रदीप पवार, मा. सचिन आरोटे, मा. सचिन नरवडे, मा. धोंडीभाऊ चव्हाण, मा. कारभारी बापू आरोटे, मा. पोपटराव हांडे, मा. शारदाताई गायकर, मा. शालुबाई कोंडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मा. भारत आरोटे, मा. ज्ञानदेव रामनाथ भोर, मा. नारायण थटार, मा. जगदीश तळेकर, मा. कैलासशेठ शेळके, मा. किसनराव पोखरकर, मा. विठ्ठलशेठ गायकवाड (सर), मा. सुरेश पाटील देशमुख, मा. श्री. संजय लोखंडे यांचीही उल्लेखनीय उपस्थिती लाभली. नवीन शाखा कोतुळ येथील ब्राम्हणवाडा रोड (खटपट नाका) येथे सुरू करण्यात आली असून या शाखेमुळे शेतकरी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांना बचत, कर्ज व इतर आर्थिक सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होणार आहेत. उद्‌घाटनाच्या पहिल्याच दिवशी तब्बल ३०० हून अधिक सभासदांची नोंद करण्यात आली असून कोट्यवधी रुपयांच्या ठेवी जमा झाल्याने संस्थेच्या कार्याला दमदार सुरुवात मिळाली आहे.

संस्थेचे संस्थापक माजी अध्यक्ष मधुकर (दादा) गायकर यांनी कै. शेळके मास्तर, महाले मास्तर, बोडके मास्तर, श्री. एस. एस. हांडे, स्व. जे. डी. मते साहेब आदी सहकाऱ्यांच्या सहकार्याने १० जानेवारी १९७९ रोजी संस्थेची स्थापना केली. संस्थेच्या जडणघडणीत एस. जी. हुलवळे साहेब यांचेही मोलाचे योगदान लाभले. आज संस्था सहाशे कोटी रुपयांच्या टप्प्यावर पोहोचली असून तिचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्री. भानुदास आरोटे, उपाध्यक्ष श्री. अमोल उगले, संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग तसेच सरव्यवस्थापक श्री. भाऊसाहेब गवांदे यांनी सभासद व नागरिकांचे आभार मानले. नव्या शाखेमुळे यशोमंदिर परिवाराच्या प्रगतीला आणखी बळ मिळणार असून सहकार क्षेत्रातील संस्थेची वाटचाल अधिक गतिमान होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



# जिल्हा ते राज्य असा प्रवास करत नेतृत्वाला मिळालेली ही संधी प्रेरणादायी - मा. सभापती राहुल भैय्या झावरे

**गोरेगाव : (समर्थ गांवकरी)**



भारतीय जनता पक्षाच्या नव्या प्रदेश कार्यकारिणीत डॉ. सुजय विखे पाटील यांची प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच निवड झाली आहे. या निवड झाल्याबद्दल पारनेर पंचायत समीतीचे सभापती राहुल भैय्या झावरे यांनी विळद घाट येथे डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार करत एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव साजरा केला. या निवडीबद्दल पारनेर तालुक्यामध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे विधानसभा, नगरपालिका व महानगरपालिका निवडणुकांदरम्यान डॉ. विखे पाटील यांनी केलेल्या संघटनात्मक कामाची आणि अहिल्यानगर जिल्ह्यात मिळवलेल्या यशाची दखल पक्षश्रेष्ठींनी घेउन डॉ. सुजय विखे पाटील यांची प्रदेश उपाध्यक्षपदी वर्णी लावली. मा. सभापती राहुल भैय्या झावरे प्रतिक्रिया देताना म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह वरिष्ठ नेतृत्वाने डॉ. सुजय विखे पाटील यांच्यावर दाखवलेला विश्वास हा अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना युवा नेतृत्वाला राज्य संघटनेत महत्त्वाची जबाबदारी मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# जल अर्पण दिवस उत्साहात साजरा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

जल जीवन मिशनच्या हर घर, नल से जल या योजनेअंतर्गत गावातील प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे नियमित पाणीपुरवठा करण्यात येत असून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शुद्ध व सुरक्षित पाणी देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, त्यामुळे गावकरी समाधानी आहेत, असे प्रतिपादन इवळेश्वरच्या सरपंच वंदनाताई दुधराम राठोड यांनी जल अर्पण दिवस कार्यक्रमात केले. केंद्र व राज्य शासनाच्या वतीने जल जीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल से जल' घोषित गावांमध्ये नियमित पाणीपुरवठा सुरू असलेल्या ठिकाणी जल अर्पण दिवस साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार माहूर तालुक्यातील अतिदुर्गम भागातील इवळेश्वर येथे हा दिवस आज मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# नारायणगाव येथून मेन लाईन ३३ के व्ही सातत्याने फॉल्ट असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

नारायणगाव येथून मेन लाईन ३३ के व्ही सातत्याने फॉल्ट झाल्यामुळे शेतकरी वर्गात सातत्याने चिंतेचे वातावरण पसरलेले आहे . याबाबत खासदार डॉ . अमोल कोल्हे व आमदार शरद सोनवणे व तहसीलदार यांनी तातडीने लक्ष घाला अशी चर्चा या भागात शेतकऱ्यांमध्ये सुरू आहे .

नारायणगाव येथून येणारी मेन लाईन कुमशेत, गोळेगाव , पिंपळगाव सिद्धनाथ, अलदरे , महाबरेवाडी , सुसर बाग, विठ्ठलवाडी , हापुस बाग , वडज धामणखेल बेलसर , येणेरे , बस्ती , सावरगाव व इतर परिसरात शेतकऱ्यांना खूपच त्रास लाईन फॉल्ट होत आहे .

त्यामुळे माणिकडोह येथून येणारी मेन लाईन सातत्याने बंद ठेवण्यात येत आहे . यामुळे आदिवासी दुर्गम भागामध्ये येथील शेतकरी बांधवांना लाईन फॉल्ट चा फटका बसला आहे . या परिसरामध्ये कांदा उत्पादन क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. सध्या कांद्याला एक किंवा दोन पाण्याची अत्यंत गरज आहे . अशा या परिस्थितीमध्ये सातत्याने लाईन फॉल्ट झाल्यामुळे कांदा फुगवणीला मोठा फटका बसणार आहे.तसेच इतरही पिकांना पाण्याचा फटका बसल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे . लाईन फॉल्ट सातत्याने झाल्यामुळे बिबट्याचा वावर वाढत असल्याने शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे . दोन महिनाभरापासून चार ते पाच तास लाईट दिवसभर नसल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी खूपच त्रास होत आहे .शेतीच्या पिकासाठी पाणी उन्हाळ्यात जास्त लागत आहे. शेतकऱ्यांच्या पिकाला बाजार नसल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त असून यामध्ये वारंवार वीज प्रवाह बंद सातत्याने होत आहे. याबाबत खासदार डॉ. अमोल कोल्हे , आमदार शरद सोनवणे व तहसीलदार तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ जुन्नर यांनी याबाबत तातडीने लक्ष घाला अशी चर्चा तालुक्यात जोरदार सुरू आहे .



दोन महिन्यांपासून चार ते पाच तास लाईट दिवसभर नसल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी खूपच त्रास होत आहे .शेतीच्या पिकासाठी पाणी उन्हाळ्यात जास्त लागत आहे. शेतकऱ्यांच्या पिकाला बाजार नसल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त असून यामध्ये वारंवार वीज प्रवाह बंद सातत्याने होत आहे.

# जगद्गुरु तुकारामांनी जो शेतू बनविला तो फक्त जगाच्या उद्धारासाठी

## हभप संजयमहाराज पाचपोर : वडझिरे येथे अखंड हरीनाम सप्ताह



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

श्रीसंत तुकाराम महाराज बिजोत्सवा निमित्त पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील अखंड हरीनाम साप्ताहास 50 वर्ष पूर्ण झाल्यामुळे, सुवर्ण महोत्सवी अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.या भव्य कीर्तन सोहळ्यातील नवव्या दिवसाचे किर्तन पुष्प रामायनाचार्य हभप संजयमहाराज पाचपोर यांनी गुंफले.

यावेळी निरूपण करताना, हभप संजयमहाराज पाचपोर यांनी " तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम, धन्य तुकोबा समर्थ त्याने केला हा पुरुषार्थ " या कवी रामेश्वर भट्ट यांच्या अभंगावर निरूपण केलें.

यावेळी बोलताना पाचपोर महाराज म्हणाले,संत तुकाराम महाराज यांच्या नामात एवढी मोठी ताकत आहें, तुकाराम तुकाराम नामाचा जप केल्यास मृत्यूची देवता यम थरथर कापते.जद्गुरू तुकारामांनी जो शेतू बनविला तो फक्त जगाच्या उद्धारासाठी बनविला.तुकाराममहाराज हे विष्णुचे अवतार आहेत.असून, त्यांच्या नामात अपार शक्ती आहे,की, त्यामुळे भक्ताचे रक्षणच होते असे सांगितले.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दातेसर म्हणाले,

वडझिरे येथील कार्यक्रम अतिशय नेटका झाला. अखंड 50 वर्ष हि सेवा तहहयात सुरु आहें याचा अभिमान वाटतो.

एवढ्या मोठ्या कार्यक्रमाला येण्याचा योग आला मी स्वतःला धन्य समजतो.धार्मिक कार्यक्रमात आपण मुक्त होतो. साप्ताहाची परंपरा कायम ठेवावी असे सांगत साप्ताह कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. साादर किर्तन श्रवणासाठी मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. याप्रसंगी पारनेर नगर विधानसभा मतदार संघांचे आमदार काशिनाथ दातेसर हे होते.

# नाफेड खरेदी केंद्रांच्या मनमानीविरोधात शेतकऱ्यांचा इशारा

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील व जिल्ह्यातील नाफेड खरेदी केंद्रांवर हरभरा खरेदी प्रक्रियेदरम्यान होत असलेल्या कथित गैरव्यवहाराविरोधात शेतकरी बांधवांनी तीव्र नाराजी व्यक्त करत थेट इशारा दिला आहे. खरेदी प्रक्रियेत कोणताही गैरव्यवहार, अतिरिक्त आकारणी किंवा नियमबाह्य कपात सहन केली जाणार नसल्याचे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले आहे. शासकीय नियमांनुसार एका बॅगेचे वजन ५० किलो ४३० ग्रॅम इतकेच घ्यावे, जादा वजन जबरदस्तीने घेऊ नये, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यापेक्षा अधिक वजन घेण्याचा प्रयत्न झाल्यास शेतकरी त्याचे व्हिडिओ चित्रीकरण करून थेट पणन महासंघ व जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

# प्रेम प्रकरणातून एकाचा खून, सात आरोपी ताब्यात

**बिलोली : (समर्थ गांवकरी)**



बिलोली तालुक्यातील रामतीर्थ पोलीस ठाण्या हद्दीतील मौ. थडी सावळी येथे तरुण दुर्गेश्वर धारासिंग ठाकुर ( २२ )रा. मुतन्याळ ता. बिलोली या युवकाचा प्रेमप्रकारणातून खून केल्याची दक्कादायक घटना घडली आहे, या प्रकरणातील सात आरोपिंना रामतीर्थ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तालुक्यातील मौ. थडी सावळी येथील( दि ३) मार्च रोजी सकाळी ७ ते ८ च्या दरम्यानची घटना, थडी सावळीपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या मूतन्याळ येथील तरुण दुर्गेश्वर धारासिंग ठाकुर ह्यास थडी सावळी येथे गंगासिंह ठाकुन यांच्या घरी आणून तु आमच्या नातलगातील मुलीसोबत अनैतिक संबंध का ठेवलास म्हणून शिवीगाळ करून छाती,पाठीवर व गुप्तआंगावर लाथा बुक्यांनी आणि काळ्या केबलने गंभीर मारहान केली, यामुळे दुर्गेशसिंह ठाकूर याचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर,सपोनि विक्रम हराळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा व तपासाची पाहणी केली. या प्रकरणी रविंद्रसिंह हनुमानसिंह ठाकुर ऊर्फ चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुरनं. 34/2026 कलम 103,189(2),191(2),190, 118(1),115(2),352,BNS 2023 गुन्हा नोंद करून पद्मसिंह गंगासिंह ठाकुर,राजूसिंग गंगासिंग ठाकूर, गंगासिंग हनुमानसिंग ठाकूर हे तिघे रा. थडी सावळी ता. बिलोली,तसेच दिलीपसिंह ठाकुर,विजय सिंग ठाकूर, विशालसिंह ठाकूर,प्रतापसिंग ठाकूर हे सर्व राहणार निर्मल तेलंगणा अशा सात आरोपिंना रामतीर्थ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या गुन्हाचा पुढील तपास सपोनि विक्रम हराळे हे करीत आहेत.

# शिर्डीत डॉ. सुरेश हावरे यांचे ४६ लाखांचे सुवर्ण 'ॐ' अर्पण!



**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

देश-विदेशातील लाखो साईभक्तांची साईबाबा यांच्यावर अढळ श्रद्धा असून भाविक भक्तिभावाने विविध प्रकारे दान अर्पण करीत असतात. याच श्रद्धेपोटी श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट चे माजी अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त श्रींच्या चरणी ३०९.५०० ग्रॅम वजनाची आकर्षक नक्षीकाम असलेली ६ सुवर्ण 'ॐ' अक्षरे अर्पण केली. या सुवर्ण दानाची एकूण किंमत सुमारे ४६ लाख ९ हजार ७४ रुपये इतकी आहे. सदर सुवर्ण 'ॐ' अक्षरे श्री साईबाबांच्या समाधी मंदिरात मूर्तीमागील भिंतीवर विधीवत बसविण्यात आली आहेत. या देणगीनंतर संस्थानच्या वतीने डॉ. सुरेश हावरे यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर (भा.प्र.से.) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. साईभक्तांकडून या उदात्त दानाचे स्वागत करण्यात येत असून मंदिराच्या वैभवात आणखी भर पडल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# गुंगीचे औषध देऊन वस्तीगृहातील अल्पवयीन विद्यार्थ्यांमध्येच लैंगिक अत्याचार

## इगतपुरीच्या समाजकल्याण वसतिगृहातील प्रकार : सात विधीसंघर्षित विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल

**इगतपुरी शहर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांसोबत धक्कादायक घटना समोर आली आहे. वसतिगृहातील दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी याच वसतिगृहातील पाचवी ते सातवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

शहरातील समाजकल्याण विभागाच्या वस्तीग्रहातील दहावीत शिक्षण घेणाऱ्या सात विधि संघर्षित विद्यार्थ्यांनी याच वस्तीगृहातील अल्पवयीन विद्यार्थ्यांना गुंगीचे औषध देऊन त्यांच्यावर शारीरिक व लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला.



या गैरप्रकाराने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी घटनेकडे दुर्लक्ष केल्याप्रकरणी वसतिगृह अधिक्षक सुशांत दुधसागरे यांच्यासह सात विधिसंघर्षित विद्यार्थ्यांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी बुधवार (ता. ४ रोजी) भेट देऊन पोलीस निरीक्षक सारिका अहिरराव यांना मार्गदर्शन करून आवश्यक त्या सुचना करून प्रकरणाचा लवकरात लवकर छडा लावण्याच्या सूचना केल्या.

गेल्या सात महिन्यापासून हा प्रकार सुरू असल्याने मोठ्या विद्यार्थ्यांच्या भितीपोटी पीडित मुलांनी या प्रकाराची वाच्यता केली नाही. दरम्यान वसतिगृह अधीक्षक सुशांत रमेश दुधसागरे यांना पीडित मुलांनी माहिती दिली होती.मात्र त्यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला. या वसतीगृहात राहून दहावीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या सात विधिसंघर्षित विद्यार्थ्यांनी वसतिगृहातीलच पाचवी ते आठवीच्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्यांना गुंगीचे औषध भांगेच्या गोळ्या देऊन वसतिगृहाच्या बाहेरील झुडपात बळजबरीने नेऊन त्यांच्याशी वेळोवेळी अनैसर्गिक शारीरिक व लैंगिक संबंध केले.या घृणास्पद प्रकाराने तालुक्यातील खळबळ उडाली आहे. या प्रकरणी संशयित सात विधिसंघर्षीत विद्यार्थी व वसतिगृह अधिक्षक यांच्या विरोधात बालकांचे लैंगिक अत्याचार व महाराष्ट्र आणि रॅगिंग प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील प्रकरणाचा अधिक तपास पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सारिका आहिरराव उपनिरीक्षक कांचन भोजने गोपनिय विभागाचे पोलीस हवालदार निलेश देवराज हे पुढील तपास करीत आहेत.

**गुन्ह्यातील १० वीत शिकणाऱ्या ७ विद्यार्थ्यांना बुधवारी ताब्यात घेतल्यानंतर या सर्व विद्यार्थ्यांची इगतपुरी ग्रामीण रुग्णालयात मेडीकल करण्यात आली. या सर्व विद्यार्थ्यांना गुरुवार ५ रोजी नाशिक येथील प्रधान बाल न्यायालय मंडळात हजर करणार आहे. वसतिगृह अधिक्षक यांच्या जबाबानंतर सदर गुन्हयात हलगर्जी करणाऱ्या वसतिगृहातील चालकांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहे.**
**- सारिका अहिरराव, पोलीस निरीक्षक**

**दिवाळीपासून आमच्यावर बळजबरीने आत्याचार सुरु होता. वसतिगृहातील मोठे विद्यार्थी आम्हाला मारहाण करत गुंगीच्या गोळ्या देऊन निर्जनस्थळी नेत आत्याचार करीत असत.कोणालाही काही सांगितल्यास मारण्याची धमकी देत असल्याने आम्ही खुप घाबरलो होतो.**
**- पिडीत विद्यार्थी**

# उद्यापासून जामखेड शहर रहाणार बेमुदत बंद

## राष्ट्रीय महामार्गाच्या उपअभियंता चेमटे यांची टोलवाटोलवी

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय महामार्ग विभागाचे डेप्युटी इंजिनियर सुजित चेमटे यांनी दि. ५ मार्च २०२६ पर्यंत महामार्गाची अधिकृत हद्द निश्चित करून कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर दि. २६ फेब्रुवारी रोजीचा जामखेड बंद मागे घेतल्यानंतरही दिलेल्या आश्वासनानुसार अतिक्रमण काढण्यासाठीची कोणतीही प्रक्रिया न केल्याने मागे घेतलेले जामखेड बंदचे आंदोलन पुन्हा पुकारले असून राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता सुजित चेमटे व संबधीत वरिष्ठ अधिकारी जोपर्यंत हद्द निश्चित करत नाहीत तोपर्यंत उद्या दि. ६ मार्चपासून सर्व पक्षीय व सर्व सामाजिक संघटना यांच्या वतीने बेमुदत बंद पुकारात येत असल्याचे



जाहीर करण्यात आले आहे.

जामखेड शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी जामखेड जिल्हा अहिल्यानगर वरील शहरातील रस्त्याच्या कामाला कायमस्वरूपी, अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्यासाठी. दि. २६ मार्च २०२६ पासून अतिक्रमण बाबत अंतिम कार्यवाही होईपर्यंत सर्व पक्षीय जामखेड शहर बेमुदत बंद ठेवण्यात येणार होता मात्र राष्ट्रीय महामार्ग विभागाचे उपअभियंता सुजित चेमटे यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर जामखेडबंद मागे घेण्यात आला होता.

गेली साडेतीन वर्षांपासून जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. ते अनेक अडथळे व कासव गतीने सुरू आहे. यामुळे अनेक छोटे मोठे अपघातही झाले आहेत. यामधे अनेक जण जायबंदी तर काहींना आपले जीव

राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता चेमटे यांनी ५ मार्च २०२६ पर्यंत महामार्गाची हद्द निश्चित करण्याचे लेखी दिले होते. परंतू हद्द निश्चितीची कोणतेही प्रक्रिया न झालेमुळे राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता श्री. चेमटे यांनी व संबधीत वरिष्ठ अधिकारी हद्द निश्चित करत नाहीत तोपर्यंत शुक्रवार दि ५ मार्च २०२६ रोजी पासुन सर्व पक्षीय व सर्व सामाजिक संघटना यांच्या वतीने बेमुदत बंद पुकाराला आहे. तरी सर्व व्यापारी, ग्रामस्थ व पत्रकार बांधव यांनी शहर विकासासाठी सहकार्य करावे असेही आवाहन आंदोलकांन कडून करण्यात आले आहे.

गमवावे लागले आहेत. हे काम सुरू असताना अनेक अडचणींबरोबरच अतिक्रमण काढणे हा मोठा अडथळा ठरत आहे. यासाठी विविध पक्षसंघटनांकडून अनेक आंदोलने तर प्रशासकीय पातळीवर अनेक बैठका. तसेच जिल्हाधिकारी यांनी याठिकाणी प्रत्यक्ष भेटू देऊन अतिक्रमण काढण्याच्या सुचना करूनही काहीच होत नसल्याने अखेर जामखेडकरांनी अखेर सर्वपक्षीय व बेमुदत जामखेड बंदचे हत्यार उपसले होते.

त्याच अनुषंगाने जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८डी मार्गावरील अतिक्रमणाच्या प्रश्नावरून सर्व पक्षीय व सामाजिक संघटनांनी काही दिवसापूर्वी पुकारलेला बेमुदत बंद स्थगित करण्यात आला होता.

# स्टुडंट टॅलेंट सर्च परीक्षेत हिंदसेवा चे २६ विदयार्थी जिल्हास्तरीय व केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत चमकले

**अहिल्यानगरः (समर्थ गांवकरी)**

हिंदसेवा मंडळाची प्राथमिक शाळा बागडपट्टी विभागाचे २५ विदयार्थी स्टुडंट टॅलेंट सर्च या स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकले. जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत इयत्ता पहिली -शेख माहेनूर शाहरुख -जिल्हात सहावी आली.

इयत्ता दुसरी मधील समृध्दी पठारे -जिल्हयात दुसरी,गीत जपे- जिल्हयात तिसरी, शेख अम्मारा - जिल्हयात चौथी, बेरड अमृता - जिल्हयात पाचवी,कदम दिव्या -जिल्हयात सहावी, शेख अल्तमश- जिल्हयात सातवा क्रमांक मिळविला. इयत्ता तिसरी मधील शेळके सेजल -जिल्हयात पंधरावी,लाड सर्वेश -जिल्हयात पंधरावा, इयत्ता चौथी मधील म्हस्के चिन्मय-जिल्हयात चौथा ताकपेरे जिविका-जिल्हयात सोळावी,नलगे शिवम - जिल्हयात सतरावा,केंद्रस्तरीय गुणवत्ता



यादीत इयत्ता पहिली मधील बागवान तहुरा - केंद्रात पहिली, शेख सारा - केंद्रात दुसरी, शेख मुबशिरा - केंद्रात तिसरी, शेख आस्मा- केंद्रात पाचवी,इयत्ता दुसरी मधील धायतडक सृष्टी - केंद्रात पहिली,जावळे कार्तिक - केंद्रात दुसरा, आगळे सोहम-केंद्रात तिसरा,इयत्ता तिसरी मधील श्रावणी जाधव-केंद्रात पहिली,

गंगावणे विश्वजित-केंद्रात दुसरा,कलंके तन्वी-केंद्रात तिसरी,इयत्ता चौथी मधील शेख सिमरा-केंद्रात पहिली,ढेरे सत्यजित -केंद्रात तिसरा,कांबळे अर्णवी -केंद्रात चौथी, खेडकर आदिती-केंद्रात पाचवी अशा २६ विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश मिळवले आहे.स्पर्धा परीक्षेसाठी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे तसेच शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन करीत असतात. स्पर्धा परीक्षेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय व केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत मोठे यश मिळविले आहे.यामुळे हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचा नावलौकिकात भर पडली आहे.असे गौरवोद्गार शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी काढले.

# जिल्हा-तालुकास्तरीय एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन 2024-25 पासून महाराष्ट्र स्तरावर ऑनलाईन पद्धतीने राबवली जात असून अनुसूचित जातीतील जे विद्यार्थी 50 टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत व ज्या विद्यार्थ्यांना समाज कल्याणच्या शासकीय वस्तीगृहामध्ये प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांकरिता स्वाधार योजना राबवली जात आहे. सदरील योजना ही जिल्हास्तर तसेच तालुका स्तरावरती राबविण्यात येते. नुकतेच 23 फेब्रुवारी रोजी सामाजिक न्याय भवन नांदेड या ठिकाणी एक दिवसीय महाविद्यालयांची मार्गदर्शनपर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेअंतर्गत कार्यक्रमाचे अध्यक्षपदी संतोष चव्हाण, सहय्यक लेखाअधिकारी समाज कल्याण कार्यालय नांदेड व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती लक्ष्मी गायके, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक तसेच कार्यालयीन अधीक्षक, स.क.नांदेड. व स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील जालिंदर गायकवाड तसेच तालुकास्तरीय वरील प्रमुख पाहुणे म्हणून राजश्री शाहू जुनियर कॉलेज लोहा प्राचार्य श्री.फाजगे, नांदेड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राचार्य व कर्मचारी समतादूत हे कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच सदरील कार्यशाळेचे प्रास्ताविक श्रीमती अंजली नरवाडे, तालुका समन्वयक यांनी केले व श्रीमती गायके यांनी उपस्थित महाविद्यालयातील कर्मचारी यांना सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यासाठी सूचना दिल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष चव्हाण यांनी सदर योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी व जे विद्यार्थी वस्तीगृह प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींबाबत महाविद्यालय स्तरावरती कार्यशाळा घेऊन त्यांच्या अडचणींचे निरसन करण्यासाठी त्यांनी सूचित केले. समाज कल्याण कार्यालय अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेमध्ये पीपीटी मार्फत शासन निर्णयातील नियम व अटी नुसार सविस्तर मार्गदर्शन उपस्थित सर्व महाविद्यालयाच्या प्रतिनिधींना देण्यात आले त्यामध्ये उपस्थितांचे प्रश्नांचे निरसन करून सदरील योजना प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता शिवानंद मिनगिरे सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून नांदेड जिल्ह्यातील सर्व स्वाधार योजनेस पात्र विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्र महाविद्यालयांमार्फत विहित वेळेमध्ये व योग्यरीत्या पूर्तता करण्याकरिता सहकार्य करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

# अरुण बोमनाळीकर यांचे निधन

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

सिद्धार्थ नगर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनिअर अरुण वामनराव बोमनाळीकर यांचं वयाच्या ५९ व्या वर्षी बुधवारी, दि.४ मार्च रोजी रात्री १० वाजता ऱ्हदविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कंधार येथील स्मशानभूमी येथे दि.५ मार्च रोजी दुपारी १ वाजता अंत्यविधी करण्यात आली. त्यांच्या पश्चात आई/वडील,पत्नी,एक मुलगी,एक मुलगा,दोन भाऊ,एक बहीण असा मोठा परिवार आहे. पत्रकार विपुल बोमनाळीकर यांचे ते वडील बंधू होत. त्यांच्या अंत्यविधीला नातेवाईक,राजकीय, सामाजिक क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती होती.

# डॉ. पाऊलबुधे अध्यापक विद्यालय क्रीडा सांस्कृतिक स्पर्धेत जनरल चॅम्पियनशिप मानकरी ठरला

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) संगमनेर यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्हा अंतर्गत अध्यापक विद्यालयांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धांचे आयोजन डॉ. ना. ज. पाऊलबुधे अध्यापक विद्यालय येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डाएट चे प्राचार्य डॉ.राजेश बनकर होते. तसेच कार्यक्रमास प्रमुख पाहुणे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामकिसन देशमुख यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे सांगितले. प्रमुख उपस्थिती म्हणून संगमनेर डाएटचे वरिष्ठ अधिव्याख्याता श्री.लक्ष्मण सुपे,



अधिव्याख्याता श्री.मुकुंद दहिफळे, डाएट चे सांख्यिकी सहाय्यक श्री. नितीन टिळेकर, लघुलेखक श्री. आशिष राऊत उपस्थित होते.

स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील विविध अध्यापक विद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या जिल्हास्तरीय स्पर्धेत डॉ.ना. ज.पाऊलबुधे अध्यापक विद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये बक्षिसे मिळवली. यामध्ये रांगोळी स्पर्धेत माया त्र्यंबके हिने प्रथम क्रमांक, निबंध स्पर्धेत मृणाली नजन प्रथम क्रमांक, पोस्टर्स स्पर्धा द्वितीय क्रमांक कोमल नढे, समूह गायन स्पर्धा तृतीय क्रमांक (प्रथम वर्ष व द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी संघ) थाळी फेक स्पर्धेत आरती लोखंडे द्वितीय क्रमांक, तर गोळा फेक मधे गंणगे गणेश याने द्वितीय क्रमांक मिळवला 8.100 मीटर धावणे स्पर्धेत मयुरी राऊत हिने तृतीय क्रमांक मिळवला. सर्वात जास्त गुण पाऊलबुधे अध्यापक विद्यालयास मिळाल्यामुळे मुलींना जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी प्रदान करण्यात आली. सर्व बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे अध्यापक विद्यालयाच्या व संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.आणि बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. तसेच अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्या सविता सानप, विविध विभागांचे प्राचार्य तसेच प्रा.मीरा डिमळे व सर्व प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. क्रीडा सांस्कृतिक स्पर्धेत अध्यापक विद्यालयाने मिळवलेल्या जनरल चॅम्पियनशिपचे यशाबद्दल सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ आदींनी सर्व विद्यार्थी, शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

# नगर शहर राष्ट्रवादीचे पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

- आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान
- युवक, ओबीसी, भटक्या विमुक्त जाती व एसटी महामंडळ जिल्हा अध्यक्ष पदांसाठी नवी नियुक्ती

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार गट) च्या विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. युवक शहर जिल्हाध्यक्षपदी सूरज कोतकर, ओबीसी शहर जिल्हाध्यक्षपदी दीपक खेडकर, कार्याध्यक्षपदी नितीन घोडके, भटक्या विमुक्त जाती शहराध्यक्षपदी सूरज शिंदे, तर एसटी महामंडळ अध्यक्षपदी ज्ञानदेव अकोलकर यांची निवड करण्यात आली. निवडीचे पत्र आमदार संग्राम जगताप आणि शहर



जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या हस्ते नव्या पदाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले. याप्रसंगी पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी, नगरसेवक आणि मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी मार्गदर्शन करताना आमदार संग्राम जगताप म्हणाले, मिळालेले पद हे फक्त व्हिजिटिंग कार्डपुरते नसून जबाबदारीचे आहे. पदाच्या माध्यमातून समाजातील लहानमोठे प्रश्न सोडवा, नागरिकांशी स्नेहाचे संबंध प्रस्थापित करा. कामाच्या माध्यमातूनच पदाला न्याय देता येतो आणि समाजात आपली ओळख निर्माण होते. पदाचा उपयोग लोकसेवेसाठी करा सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून समाज एकत्र आणा. नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण करणारा 'कामाचा माणूस' म्हणून आपली छाप पाडा.हेच खरे कार्यकर्तृत्व आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले, स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीला साजेसे काम करून दाखवा. कुठल्याही पदावर असताना स्वार्थ बाजूला ठेवून प्रामाणिकपणे काम करा.पद हे जबाबदारीचे आहे. समाजातील प्रश्न सोडविणे, शासनाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविणे हीच खरी कार्यकर्त्यांची ओळख आहे.

नवनियुक्त पदाधिकारी सुरज कोतकर, दीपक खेडकर, नितीन घोडके, सुरज शिंदे आणि ज्ञानदेव अकोलकर यांनी संयुक्तपणे सांगितले, आम्ही आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरातील जनतेच्या प्रश्नांवर काम करू. मिळालेल्या पदाच्या माध्यमातून समाजामध्ये सकारात्मक बदल घडवू आणि पक्षाची ताकद वाढवू. या कार्यक्रमाला प्रा. माणिकराव विधाते, माजी नगरसेवक दगडू मामा पवार,नगरसेवक विकी जगताप, अविनाश घुले, अमोल गाडे, गटनेते प्रकाश भागानगरे, रेवणनाथ पवार, विशाल नाकाडे,रवींद्र बारस्कर, बापूशेठ नागरगोजे आदी मान्यवर उपस्थित होते.

# गृहनिर्माण संस्थांची कार्यशाळा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

शहरी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करून तक्रारींचा सत्वर निपटारा करण्याच्या उद्देशाने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' राबविण्यात येत आहे. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी या अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष व सचिव यांची कार्यशाळा शनिवार 07 मार्च 2026 रोजी सकाळी 11 वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत नोंदणी व मुद्रांक विभाग तसेच सहकार विभागाशी संबंधित कायदे, नियम व कार्यपद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" प्रभावी राबविण्याबाबत मार्गदर्शन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागामार्फत ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या अनुषंगाने आज ५ मार्च २०२६ रोजी नांदेड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी (बीडीओ) तसेच ग्रामपंचायतींचे सरपंच यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधण्यात आला. या संवादादरम्यान विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महसूल विभागाशी संबंधित सेवा तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अकृषिक रुपांतरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक नसणे, सनद प्रणाली, संपुष्टात आणण्याची प्रक्रिया, एकवेळचे अधिमूल्य भरण्याची नवी तरतूद, तुकडेबंदी कायद्यातील सुधारणा तसेच अभिलेख अद्ययावत करण्यासंदर्भातील विविध सुधारणा यांची माहिती ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती व प्रसार अभियान राबविण्याचे निर्देश दिले. याशिवाय महसूल विभागाबरोबरच इतर शासकीय विभागांच्या सेवांबाबत नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी योग्य नियोजन करण्यास सांगण्यात आले. नागरिकांच्या दीर्घकालीन प्रलंबित तक्रारी तसेच दैनंदिन सेवा एकाच खिडकीतून मंडळस्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या समाधान शिबिरांद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

तसेच या अभियानाची माहिती प्रत्येक गावातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक प्रचार व प्रसिद्धी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ग्रामसभा, दवंडी, सूचना फलक, सोशल मीडिया तसेच इतर माध्यमांचा वापर करून नागरिकांना शिबिरांची माहिती देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.



# समाजकल्याण योजनांची चित्ररथाद्वारे जनजागृती

- जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दाखवली चित्ररथाला हिरवी झेंडी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

समाजकल्याण विभागाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी एलईडी चित्ररथाद्वारे जिल्ह्यात जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या चित्ररथाला आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात आयोजित या कार्यक्रमास प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे, उपसंपादक अलका पाटील, लेखा लिपीक अनिल चव्हाण उपस्थित होते. हा चित्ररथ जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जाऊन समाज कल्याण विभागाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणार असून लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे.

# क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीपूर्ती निमित्ताने एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

हिंदसेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी विभाग व संशोधन केंद्र यांच्या वतीने"क्रांतिसूर्य बिरसा मुंडा" यांच्या १५० व्या जयंतीपूर्ती निमित्ताने 'क्रांतिसूर्य बिरसा मुंडा : जीवन व कार्य' या विषयावर एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन प्रसंगी क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला हिंदसेवा मंडळाचे कार्याध्यक्ष आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थान हिंदसेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक




यांनी भूषविले. तर या कार्यक्रमात हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी,गांधीनगर गुजरात येथील ट्रायबल रिसर्च इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर प्रा. डॉ. चंदूभाई चौधरी,नंदुरबार येथील ज्येष्ठ विचारवंत जेलसिंग पावरा, यवतमाळ येथील संशोधक,अभ्यासक रामचंद्र आत्राम, सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ सावळे,आदिवासी मुलींच्या वसतिगृहाच्या गृहपाल श्रीमती मनाली उदास, प्रा. डॉ. अशोक डोळस यांच्यासह प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे, प्रबंधक अशोक असेरी, डॉ.नवनाथ भोंदे. तर दुसऱ्या सत्रात नंदुरबार येथील ज्येष्ठ विचारवंत जेलसिंग पावरा, यवतमाळ येथील संशोधक, अभ्यासक रामचंद्र आत्राम, तिसऱ्या सत्रात सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ सावळे यांच्या अध्यक्षतेत देशभरातील विविध महाविद्यालयातून आलेले मान्यवर प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांनी ५२ शोधनिबंध यावेळी सादर केले.समारोप सत्रात प्रा.डॉ.अशोक डोळस आणि आदिवासी मुलींच्या वसतिगृहाच्या गृहपाल,श्रीमती मनाली उदास हे उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्राचार्य प्रा. डॉ. माहेश्वरी गावित म्हणाल्या, "भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एका समर्पित क्रांतिकारक आदिवासी तरुणाचे नाव आहे बिरसा मुंडा. बिरसाचे कार्य हे केवळ आदिवासींसाठी नव्हते, तर सर्वांसाठी होते.

बिरसाचे आंदोलन देशाच्या स्वातंत्र्यासाठी व मायभूमीच्या रक्षणार्थ होते.आदिवासी सकट सर्व रंजल्या - गांजल्या- तडपलेल्या शोषितांचा आणि मुजोर व्यवस्थेने बळी घेतलेल्या वंचितांचा तो मुक्तिसंग्राम होता.क्रांतिसूर्य बिरसा मुंडाला केवळ २५ वर्षांचे आयुष्य लाभले. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर भारतात असंख्य बंड,उठाव आणि आंदोलने झाली, परंतु ज्या परिस्थितीत बिरसाने लोकयुद्ध लढले,त्याचा विचार करता बिरसाचे वेगळेपण मान्य करावेच लागते. क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या कार्यकर्तृत्वाची, विचारांची चर्चा व्हावी.या उद्देशाने राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

डॉ.रमेश झरकर म्हणाले, "दीडशे वर्षांपूर्वीचा आद्य क्रांतिकारक जल, जंगल, जमीन यासाठी लढला. बिरसा मुंडा यांनी त्याकाळात इंग्रजांना स्वाभिमानाने उत्तर दिले.'तव स्मरण आम्हा सतत स्फुरण घडो' या उक्तीप्रमाणे बिरसा मुंडांचे कार्य सतत स्मरण देणारे आहे.सर्व क्रांतिकारकांमध्ये बिरसा मुंडांचे स्थान अद्वितीय आहे.